## प्रकरण तिसरे

# डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची फलश्रुती

प्रकरण तिसरे

## पार्श्वभूमी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजकारण आणि राजकारण करीत असतानाच भारतीय समाजातील उच्चनिचता कमी होण्यासाठी आणि समाजाची उन्नती व्हावी म्हणून शिक्षण क्षेत्राकडे प्राधान्याने लक्ष दिलेले होते. त्या काळी महाराष्ट्रात काही उच्चवर्गीयांच्या शैक्षणिक संस्था पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक इ. मोठ्या शहरात होत्या. परंतू मागासलेल्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी एकही संस्था १९४५ पूर्वी नव्हती. क्रीप्स योजनेनंतर भारताला स्वातंत्र्य मिळणार हे डॉ.आंबेडकरांच्या दृष्टीक्षेपात आले होते.स्वतंत्र भारताच्या शासन दरबारात त्यांना मानमरातब, प्रतिष्ठेच्या जागा त्यांच्या विद्वतेमुळे त्यांना मिळणार याची जाणीव ही त्यांना होती. त्यांच्या सामाजिक समतेच्या विचार सरणीला अनुसरुन मुंबई प्रांतात उच्च शिक्षण देणारी एखादी संस्था नसल्याची खंत त्यांना वाटत होती. म्हणून त्यांनी १९४५साली पीपल्स एज्युकेशन सोसायटी काढण्याचा संकल्प सोडला.

## १.पीपल्स एज्युकेशन सोसायटी आणि तिचे कार्य

कोणत्याही समाजाची शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसार खेरीज प्रगती होणार नाही असे त्यांचे मत होते. शिक्षणामुळे भोळया अंधश्रद्धाळू समजूती नाहीशा होतात, लोकांची पिळवणूक थांबते, शिक्षणामुळे मन सुसंस्कृत बनते. आणि एकमेकांविषयीचे अनेक अज्ञानमूलक गैरसमज नष्ट होतात. शिक्षणामुळे होणारे सर्वात मोठे कार्य म्हणजे न्यूनगंड कमी होऊन आत्मविश्वास उत्पन्न होतो आणि आत्मविश्वास ही उन्नतीची पहिली पायरी आहे. नुसत्या प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचा प्रसार होवून भागत नाही, त्यासाठी विश्वविद्यालयीन उच्च शिक्षणाचाही प्रसार झाला पाहिजे. शिक्षणामुळे समाजाला नेतृत्व मिळते. विदयेवाचून केलेले प्रयत्न म्हणजे मानवशक्तीचा अपव्यय होय. विद्येचे महत्व समजलेला नेता जनतेला अधोगतीला नेल्याशिवाय रहात नाही. दलित , मागासलेल्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आणि वर्गीकृत जातीतील गरीब लोकांना विश्वविद्यालयीन शिक्षणाचा लाभ मिळावा आणि त्यातून नेतृत्व उदयाला यावे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई येथे ८ जुलै १९४५ रोजी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली. मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायद्यानुसार या संस्थेची १९४५ साली नोंदणी झाली तीचा नंबर १३७५ हा होता. [१]

## १.१ व्यवस्थापकीय मंडळ

व्यवस्थापकीय मंडळाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: अध्यक्ष होते तर श्री. एन. शिवराज (मद्रास प्रांत), श्री जे. एच. सुबय्या (हैद्राबाद संस्थान), श्री. आर. आर. भोळे (हैद्राबाद संस्थान), श्री. जी. टी. मेश्राम (सेंट्रल प्रांत वऱ्हाड), श्री.सितारामपंत बोले (मुंबई प्रांत), श्री. म. वा. दोंदे (मुंबई), श्री. एस. सी. जोशी (मुंबई), श्री. एच. के. पटेल (मुंबई प्रांत), बॅ. समर्थ (मुंबई), प्रा. व्ही. जी. राव हे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य होते. [२] पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उद्दिष्ट बाबासाहेबांनी नमूद करुन ठेवले आहे.

"The people education society's objective is not merely to give education, but to give education in such a manner as to promote intellectual, moral & social democracy. This is what modern India needs & this is what well wishers of India must promote"[3]

व्यवस्थापकीय मंडळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वत:अध्यक्ष होते. व एम. व्ही. दोंदे हे संस्थेचे सचिव होते. तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. तर श्री.डी.जी. जाधव आणि श्री. जी टी. मेश्राम हे सदस्य होते तसेच श्री के.व्ही. चित्रे हे पहिले सचिव होते. [४]

पीपल्स एज्युकेशन सोसायटीची पार्श्वभूमी सांगताना धनंजय कीर लिहीतात,

"बाहेर राजकीय क्षेत्रात अनिश्चित असे वातावरण असताना शिक्षण क्षेत्रात डॉ.आंबेडकरांचे एक महान स्वप्न साकार झाले. ते स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी १३ सप्टेंबर १९४५ पासून धडपड चालविली होती. राजकारणातील धकाधकी दौरे आणि गाठी भेटी यांच्या गर्दीतही त्यांनी ते स्वप्न साकार करण्यासाठी प्रचंड नि अखंड धडपड सुरु ठेवली होती. ते स्वप्न म्हणजे कनिष्ठ मध्यम बर्गीयामध्ये विशेषत: दलित वर्गामध्ये उच्च शिक्षणाचा प्रचार करण्याच्या उद्देशाने आधुनिक साहित्य आणि उत्तम शिक्षक वर्ग यांनी संपन्न असे एक महाविद्यालय सुरु करावयाचे हे होय. त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था स्थापन करुन तिच्या अधिपत्याखाली २० जून १९४६ रोजी सिध्दार्थ महाविद्यालय सुरु केले. आवश्यक तो निधी जमविण्याबाबत स्नेही आणि हिंतचिंतक यांनी व्यक्त केलेली भीती खोटी ठरली. निधी जमविण्यात त्यांना यश आले. त्यांच्या व्यक्तिमत्वामुळे कर्तृत्ववान आणि कर्तृत्व तत्पर असा नोकरवर्ग संस्थेकडे आकर्षिला गेला. भगवान गौतम बुध्दांची जी नावे आहेत, त्यापैकी सिध्दार्थ हे नाव प्रसिध्द आहे तेच त्यांनी आपल्या महाविद्यालयास दिले." [५]

मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही संस्था पुढे मागासवर्गीय समाजाच्या शैक्षणिक उत्कृर्षातील मैलाचा दगड बनली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व जाणले होते. स्वत: शिक्षण घेत असताना अनेक हाल अपेष्टा सहन केल्या होत्या याची जाणीव त्यांना होती. मागासवर्गीय समाजाला इतर उच्चवर्गीय समाजाच्या बरोबर प्रगती करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे मर्म त्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली आणि तिच्याद्वारे सामाजिक समता प्रस्थापित करणाऱ्या गौतम बुद्धांच्या नावे अनेक शाखा सुरु केल्या.

## १.२ संस्थेची ध्येय आणि उद्दिष्ट्ये

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या घटनेमध्ये खालील ध्येय धोरणे बिषद केलेली

आहेत.

१) माध्यमिक, महाविद्यालयीन, तांत्रिक, शारीरिक व इतर तत्सम शिक्षणाचा प्रसार करणे व मागास समाजाला विशेष सवलती देणे.

२) महाराष्ट्र आणि भारताच्या योग्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करुन त्या चालविणे. त्याबरोबर बौध्द धर्माचा प्रसार करण्यासाठी संघटना चालविणे, शिक्षण प्रसारासाठी शाळा महाविद्यालये, विहार, वसतिगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे स्थापन करणे आणि समाजाला शिक्षण देणे.

३) समाजातील गरीब होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विशेष सवलत देणे.

४) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी त्यांच्यात आवड निर्माण करणे. त्यांना प्रोत्साहन देणे तसेच अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती शिष्यवृत्त्या, नादारी हे उच्च शिक्षण घेत असताना देणे.

५) तसेच शास्त्र बौध्द आणि इतर ललित वाङ्‌मय यांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी चालना देणे. [६]

## १.३ संस्थेचे अधिकार

१) घटनेप्रमाणे संस्थेला स्थावर मालमत्ता विकत घेणे, त्यावर इमारती बांधणे, संस्थेसाठी निधी उभारणे, इ. अधिकार होते.

२) संस्थेसाठी नविन इमारत बांधणे, जुन्या इमारतीची दुरुस्ती करणे, इमारत भाड्याने घेणे इ. अधिकार होता.

३) संस्थेची स्थावर मालमत्ता विकणे किंवा गहाण ठेवणे त्यावर पैसा उभारणे.

४) संस्थेच्या ध्येयधोरणांशी समांतर असणाऱ्या इतर संस्थेशी सहकार्य करणे.

५) सोसायटीच्या धोरणांची परीपूर्तता करण्यासाठी निधी उभा करणे.

६) संस्थेच्या शाखा भारताच्या कोणत्याही भागात सुरु करणे.

७) संस्थेवर काही कायदेशीर गंडांतर आले तर त्याचे निरसन करणे. [७]

## १.४ संस्थेचा आदर्श

पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही एक सामाजिक ध्येयांनी स्थापन केलेली असल्याने त्या संस्थेचा आदर्श भारतात सामाजिक समता प्रस्थापित करणे हा होता. म्हणून भारतातील सामाजिक समतेचे पाहिले. पुरस्कर्ते गौतम बुध्द व बौद्ध धर्मातील इतर व्यक्तींच्या नावाने डॉ.आंबेडकरांनी विविध महाविद्यालये काढलेली दिसतात. या संस्थेचे पहिले महाविद्यालय गौतम बुध्दाचेच नांव असलेल्या सिध्दार्थ या नावाने सिध्दार्थ महाविद्यालय या संस्थेने काढले ते आज मुंबईतील एक प्रतिष्ठित कॉलेज आहे. एकदा डॉ.आंबेडकर यांनी स्वत: आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना कॉलेजला सिध्दार्थ हे नाव का दिले हे सांगताना ते म्हणाले,

"आमच्या कॉलेजचे नाव सिध्दार्थ कॉलेज असे आहे. ते का ठेवले गेले? मी जर एखाद्या कोट्याधीशाला शब्द टाकला असता तर मला काही लाख रुपये सहज मिळविता आले असते. तसे केल्याने मला त्या कॉलेजला त्या कोट्याधीशाचे नाव द्यावे लागले असते. पण मी तसा विचार केला नाही व या कॉलेजला 'सिध्दार्थ कॉलेज' हेच नाव द्यायचे असा मी निश्चिय केला. हे बुध्दाचे नाव आहे हे तुम्हाला माहीतच आहे. त्याप्रमाणे हे आमचे सिध्दार्थ कॉलेज अद्यापी छोटेसे बालक आहे. त्याला अद्यापी नऊ महिने सुध्दा झाले नाहीत. या कॉलेजने अद्यापी आपली परंपरा प्रस्थापित केली नसेल तर त्याचे मला मुळीच आश्चर्य वाटत नाही. पण तेवढ्यावरुन आमच्या या छोट्या सिध्दार्थ कॉलेजपुढे काही ध्येय नाही अशी मात्र तुम्ही आपली समजूत करुन घेवू नका. त्या ध्येयामुळेच या कॉलेजला सिध्दार्थ कॉलेज असे नाव देण्यात आले आहे. थोडक्यात गौतम बुध्दाच्या कोणत्या ध्येयासाठी ही धडपड आहे. ती म्हणजे प्रत्येक मनुष्याला विचार स्वातंत्र आहे. पण त्या स्वातंत्र्याचा उपयोग त्याने सत्यशोधन करण्यात केला पाहिजे म्हणजे ते सत्य पहाता आले पाहिजे, ऐकता आले पाहिजे, त्याचा वास घेता आला पाहिजे, त्याचा स्वाद घेता आला पाहिजे, आणि हे सत्य म्हणजेच ईश्वर. ही ध्येये

गौतमांनी आपल्या शिष्यापुढे ठेवली होती. आणि हीच ध्येये आमचे सिध्दार्थ कॉलेज अनुसरणार आहे. १) सत्य शोधून काढणे व

२) जो धर्म आपल्याला मानवता शिकवील त्याच धर्माचे अनुसरुन करणे "[८]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सिद्धार्थ महाविद्यालयाला सिद्धार्थ हे नांव का दिले हे जसे स्पष्ट केले तसेच १९५० साली सुरु केलेल्या कॉलेजला 'मिलिंद महाविद्यालय' असे नाव का दिले ? हे स्पष्ट करताना ते म्हणतात, मिलिंद हे नाव ग्रीक राजा मिनँडर याचे असून त्याने बौध्द धर्माचा स्वीकार केला होता. तर महाविद्यालयाच्या परिसराला नागसेन परिसर असे नाव दिलेले आहे. हा नागसेन देखील प्रसिध्द तत्ववेत्ता होऊन गेला. [९]

संस्था व परिसर यांना अशा तत्ववेत्त्यांची नांवे देऊन तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय इतिहासाचे, तत्वज्ञानाचे व गौतम बुद्धाने तत्कालीन समाजा विरुद्ध केलेल्या बंडाचे ज्ञान व जाणीव करुन देणे हा उद्देश होता.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे ब्रीद वाक्य 'प्रज्ञा व करुणा' हे आहे. म्हणजे ज्ञान आणि दया असा आहे. [१०]

## १.५पीपल्स एज्युकेशन सोसायटीने चालविलेली महाविद्यालये

या संस्थेने खालील महाविद्यालये सुरु केलेली आहेत आणि ही सर्व अतिशय चांगल्या पध्दतीने आज अखेर चालविलेली आहेत.

*१)मुंबई विद्यापीठाशी संलग्रीत असलेली महाविद्यालये*

१) सिध्दार्थ कला आणि शास्त्र महाविद्यालय मुंबई (स्थापना १९४६)

२) सिध्दार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय मुंबई (स्थापना १९५३)

३) सिध्दार्थ विधी महाविद्यालय मुंबई (स्थापना १९५६)

*२)डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांशी संलग्न असलेली महाविद्यालये*

१) मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद (स्थापना १९५०)

२) मिलिंद बहुउद्देशीय हायस्कूल औरंगाबाद (स्थापना १९५५)

३) संत गाडगेमहाराज विद्यार्थी वसतिगृह पंढरपूर

४) सिध्दार्थ प्रकाशन संस्था (१९५४)

बौध्द धर्मविषयीचे तत्वज्ञान व इतर ग्रंथ प्रकाशनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सांगण्यावरुन सिद्धार्थ प्रकाशन संस्था काढल्याची दिसते. या महाविद्यालयांचा प्रसार मुंबई व मराठवाडा विभागात झाल्याने आजही या विद्यालयातून तयार झालेले विद्यार्थी महाराष्ट्राच्या इतर भागात व भारतात डॉ.आबेडकरांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करताना दिसत आहेत.

## २. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे १९५६ पर्यंतचे कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४५ साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली . आणि त्यांच्या महानिर्वाणा पर्यंत (१९५६) खालील महाविद्यालये चालू होती व आजही ती चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. त्या महाविद्यालयांचे थोडक्यात कार्य पुढीलप्रमाणे –

*१) सिध्दार्थ कला आणि शास्त्र महाविद्यालय मुंबई (१९४६)*

पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे हे पहिले महाविद्यालय. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासात या महाविद्यालयाला अनन्य साधारण महत्व आहे. २० जून १९४६ रोजी सिध्दार्थ महाविद्यालयाचे उद्‌घाटन त्यावेळचे मुंबई विश्वविद्यालयाचे कुलगुरु चिमणलाल सेटलवार यांच्या हस्ते झाले. उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. या कार्यक्रमासाठी मुंबईतील प्रतिष्ठित व्यक्ती, विद्यार्थी समाजसेवक मोठ्या संख्येने हजर होते. संस्थेच्या पहिल्या महाविद्यालयास सिध्दार्थ हे नाव का दिले यांचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी केले. १९४६ साली जरी बौध्द धर्माचा स्वीकार केला नसला तरी त्यांचा कल बौध्द धर्माकडे जात होता हे यावरुन दिसून येते. कारण गौतमबुध्द हा भारतातील पहिला सामाजिक समता निर्माण करणारा आद्यप्रवर्तक

होऊन गेला. दया-करुणा-समता ही तत्वे बौध्द धर्मामध्ये डॉ.आंबेडकरांना प्रकर्षाने जाणवत होती. १९३५च्या 'येवला' परिषदेपासून बौध्द धर्माचा अभ्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वाढत होता. म्हणूनच पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सर्व संस्थाना गौतमबुध्द व बौध्द धर्मातील नामांकित व्यक्तीची नावे दिलेली दिसतात.

सिध्दार्थ  कॉलेजला भारत सरकारकडून ३ लाख रुपयाचे अनुदान मिळाले आणि त्यानिधीतून त्यांनी हे महाविद्यालय सुरुवातीला मरिन लाईन मुंबई येथे लष्कराची छावणीच्या इमारतीत सुरु केले. शासनाने या इमारती भाडे तत्वाने काही वर्षे या संस्थेस दिली. सिध्दार्थ कॉलेजची सुरुवात ही अस्पृश्य समाजाच्या शैक्षणिक इतिहासात एक महत्वाची घटना ठरली. सिध्दार्थ कॉलेजमध्ये सुरुवाती पासूनच मागासलेल्या विद्यार्थ्यांचा ओढा होता. त्याप्रमाणेच मुस्लीम, पारशी, हिंदू, ख्रिश्चन इ. अनेक धर्मीय मुले सुध्दा शिक्षण घेऊ लागली. एवढेच नाही तर सिलोन, आफ्रिका, जपान, इ. देशातील विद्यार्थी सिध्दार्थ कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ लागले. [११]

उदघाटन भाषणावेळी प्रमुख पाहुणे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु चिमणलाल सेटलवार यांनी सुशिक्षित व विचारी व्यक्तींची आपला भारत घडविण्यासाठी गरज आहे. आणि असे विद्यार्थी या संस्थेतून शिकून बाहेर पडतील अशी अपेक्षा आहे. तसेच त्यांनी तांत्रिक व शास्त्र शिक्षणावर भर द्यावा असे जमलेल्या जनसमुदायापुढे सांगितले. या भाषणात ते पुढे म्हणाले,

`` Mr.Setalvar while addresing the gathering emphasized the need of highly educated  thoughtful men,who would lead the people in the right path in the free India of tomorrow. Every effort he said,`` should be made to speed up primary education in India, at the same time steps should be taken to encourage adult education, so as to produce good citizens

in the country. It was often stated, he continued, that more attention should be paid to tecnical & scientific education, but that should not be at the expence of general higher education. It must be remebered that, in the free India of tomorrow, what we require is not demagogues but thoughtful, powerful & moderate leaders who have a long view of things & such leaders can only be produced by higher education "[12]

२० जून १९४६ हा दिवस खऱ्या अर्थाने भारतातील अनुसूचित जातीच्या इतिहासातील एक सोनेरी दिवस ठरला. कारण या महाविद्यायातून भारतातील अनेक भावी पुढारी, शास्त्रज्ञ, वकील इ. मंडळी शिकून बाहेर पडली व भारताच्या जडणघडणीत भाग घेतला सुरुवातीला या कॉलेजला दिल्लीच्या मोहनसिंग नावाच्या एका कॉन्ट्रॅक्टरने सर्व फर्निचर पुरविले पहिल्या वर्षी पटसंख्या १४०० होती तर दुसऱ्या वर्षी २२०० विद्यार्थी झाले. नंतर काही दिवसांनी संस्थेने आत्ताची इमारत फोर्ट भागात स्वत: विकत घेतली ती जवळजवळ चार मजली आहे.

*१.१ सिध्दार्थ कॉलेजचे सुरुवातीचे प्राचार्य :*

" सिध्दार्थ कॉलेजची प्रगती ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार चालू होती. पण त्याचबरोबर या महाविद्यालयला लाभलेले उत्तम प्राचार्य यांचाही मोठा वाटा होता. सिध्दार्थ कॉलेजचे पहिले प्राचार्य प्रा.डॉ.अश्वथामा गजेंद्रगडकर हे होते. ते नामांकित संस्कृत विद्वान होते. कॉलेजच्या स्थापनेपासून प्राचार्य गजेंद्रगडकर यांनी तन-मन-धन देऊन महाविद्यालयाची प्रगती केली. परंतू दुदैवाने गजेंद्रगडकर हे दीड वर्षेच प्राचार्य राहिले. कारण त्यांचे अकाली निधन झाले. यांचे डॉ.आंबेडकरांना फार दु:ख झाले. त्यानंतर दुसरे प्राचार्य डॉ.व्ही.एस.पाटणकर हे झाले ते शिस्तप्रिय होते.

भौतिकशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होते. त्यांनीही कॉलेजच्या वाढीत महत्वाची भूमिका बजावली, त्यानंतर १९५६ पर्यंत म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनावेळी सिध्दार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य एच.आर.कर्णिक होते. १९५१ साली सिध्दार्थ कॉलेज आत्ताच्या स्वत:च्या फोर्ट भागातील जागेत स्थलांतरीत झाले आहे." [१३]

### *१.२ सिध्दार्थ कॉलेजचा प्राध्यापक वर्ग :*

सुरुवातीपासून डॉ.आंबेडकरांनी सिध्दार्थ कॉलेजमध्ये प्रत्येक विषयातील तज्ञ व अनुभवी प्राध्यापक आणलेले होते. कारण त्यांच्या विद्वतेचा व ज्ञानाचा महाविद्यालयात शिकणाऱ्या गरीब , मागासलेल्या व इतर विद्यार्थ्यांना व्हावा व आपले विद्यार्थी त्या त्या विषयात तज्ञ व्हावेत ही त्यांची इच्छा होती. त्यावेळच्या प्राध्यापक वर्गातील विशेष नामांकित नावे पुढील प्रमाणे -

प्रा. अनंत काणेकर (सुप्रसिध्द मराठी लेखक), प्रा. एम. बी. चिटणीस,
प्रा. व्ही. जी. राव, प्रा. फ्रँक डिसूझा (इंग्रजी विभागप्रमुख), प्रा. सौ. गजेंद्रगडकर (तत्वज्ञान विभागप्रमुख), प्रा. टी. ए. कामत (इतिहास विभाग),
प्रा. मधु दंडवते (भौतिकशास्त्र विभाग व माजी अर्थमंत्री भारत सरकार) इ. नामांकित प्राध्यापक मंडळी शिक्षण दानाचे काम सिध्दार्थ महाविद्यालयात करीत होती व भावी पिढी घडवित होते. [१४]

### *१.३ सिध्दार्थ कॉलेजचे ग्रंथालय :*

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ग्रंथप्रेमी होते. त्यांचा स्वत:चा ग्रंथ संग्रह फार मोठा होता. सिध्दार्थ कॉलेजचे ग्रंथालय सर्व बाजूंनी सुसज्ज करण्यासाठी त्यांनी सर्व विषयांची पुस्तके ग्रंथालयात गोळा केलेली होती. इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, तत्वज्ञान इंग्रजी वाङ्:मय मराठी वाङ्:मय भारतातील संत महात्म्यांची चरित्रे, ब्रिटीश संसदेची डिबेट्स भारत सरकारची डिबेट्स व राज्य विधान सभेची डिबेट्सचे खंड, आपल्या लायब्ररीमध्ये ठेवले होते. तसेच हिंदी, गुजराती,

कन्नड, उर्दू, साहित्यातील ग्रंथही कॉलेजच्या लायब्ररीत होते. सिध्दार्थ कॉलेजच्या ग्रंथालयाला अनेक प्रकाशकांनी मोफत पुस्तके दिली होती. बी. के. मोदी यांनी आपल्या जवळील १२६ खंड ते जैन धर्माविषयी होते ते ग्रंथालयास भेट म्हणून दिले तर डॉ. आंबेडकरांच्या जवळील अतिशय दुर्मिळ ग्रंथ जवळ जवळ २० हजार पुस्तकांचा संच सिध्दार्थ महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला भेट म्हणून दिले. या शिवाय न्यायाधीश के.पी. तेलंग यांनी ग्रंथालयाला आपल्या ५ हजार पुस्तकांचा संग्रह दिलेला आहे. सिध्दार्थ कॉलेजचे ३ दशके ग्रंथपाल म्हणून एस. एस. रेगे यांनी अतिशय चांगले काम केले होते." [१५]

आजही या ग्रंथालयामुळे संशोधकांना सर्व विषयांचा अभ्यास करता येतो आणि डॉ.आंबेडकरांच्या विचारांची दिशा यांचा परामर्श घेता येतो.

## *१.४ अभ्यासक्रमाचे विषय :*

सिध्दार्थ महाविद्यालयात बी. ए., बी. एस्सी. पदवी पर्यंतच्या शिक्षणाची सोय होती आणि कला व शास्त्र शाखेतील पदवी विषयाला लागणारी सर्व विषयाची सोय कॉलेजमध्ये होती. यामध्ये इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, प्राचीन भारतीय संस्कृती, भूगोल, नागरिकशास्त्र, गणित, हिंदी, मराठी, संस्कृत, पाली, अर्धमागधी, उर्दू , गुजराती, कन्नड व पाश्चिमात्य भाषा इंग्रजी, फ्रेंच तसेच रसायन शास्त्र, भौतिक शास्त्र, प्राणीशास्त्र, बनस्पती शास्त्र इ. विषय शिकविले जात. हे सर्व विषय शिकविण्यासाठी त्या त्या विषयातील तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांची डॉ. आंबेडकरांनी नेमणूक केली होती व संबंधीत प्राध्यापक कसे शिकवितात याचीही माहिती ते वेळोबेळी घेत असत. कारण मुंबईमध्ये ज्या ज्या वेळेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य असे त्या त्यावेळेला सिध्दार्थ महाविद्यालयाला व पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयास ते भेट देवून तेथील कामकाजाची व महाविद्यालयातील प्रगतीची माहिती घेत.

## १.५ सिध्दार्थ महाविद्यालयामधील मंडळे

महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग यांचा बौध्दिक विकास होण्यासाठी कॉलेजमध्ये वेगवेगळया विषयांची मंडळे स्थापन झालेली दिसतात ती पुढील प्रमाणे -

१) इंग्रजी साहित्य मंडळ (१९४६)

२) सांस्कृतिक मंडळ (१९४६) ३) रसिकवृंदा मंडळ (१९४७)

४) इतिहास आणि अर्थशास्त्र मंडळ ५) विद्यार्थी संगीत मंडळ

६) गुजराती साहित्य मंडळ (ऑगस्ट १९४६) ७) सायन्स मंडळ (१९४६)

८) बज्म-इ-आदाब मंडळ (ऑगस्ट १९४६) ९) कर्नाटक मंडळ (१९४६)

१०) आधुनिक युरोपियन भाषा मंडळ (१४ डिसेंबर १९४६)

११) समाजसेवा संघ (१६ ऑगस्ट१९४६) १२) मराठी साहित्य मंडळ (१९४६)

१३) मल्याळी मंडळ (१० सप्टें. १९४८) १४) कोकणी मंडळ (१९४७-४८)

१५) हिंदी साहित्य मंडळ (१९४८) १६) मराठी वाङ्:मय मंडळ ( १९५०)

१७) पाश्चात्य संगीत क्लब ( १९४९-५०) १८) तत्वज्ञान मंडळ ( १९५३)

१९) इतिहास मंडळ (१९५३) [१६]

या विविध मंडळाच्या द्वारे विद्यार्थ्यांच्या बौध्दीक विकासाला हातभार लागावा. त्यांच्यातील साहित्यिक वृत्ती बाहेर यावी. विविध कला गुणांना वाव मिळावा. विद्यार्थ्यांच्या मध्ये आपआपसात मैत्री व सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे. समाज सेवा संघ सारख्या मंडळाकडून पुढे राष्ट्र सेवेच्या कामाला हातभार लागावा. अशा विविध अपेक्षेने ही 'मंडळे' डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली दिसतात.

## १.६ सिध्दार्थ महाविद्यालयातील शिष्यवृत्त्या व पारितोषिके -

सिध्दार्थ महाविद्यालय हे प्रामुख्याने मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देऊन त्यांना प्रोत्साहन मिळावे. या प्रमुख उद्देशाने सुरु केले होते. इतर समाजातील मुलांनाही गुणवत्ता शिष्यवृत्त्या देणेत याव्यात. म्हणून महाविद्यालयात अनेक शिष्यवृत्त्या

अगदी सुरुवातीपासून डॉ.आंबेडकरांनी सुरु केल्या होत्या. त्यातील काही शिष्यवृत्त्या व पारितोषिक खालीलप्रमाणे -

१) डॉ. भीमराव आंबेडकर आर्टस् पारितोषिक

२) डॉ. भीमराव आंबेडकर सायन्स पारितोषिक

३) सिध्दार्थ संस्था पारितोषिक

४) सिध्दार्थ कॉलेज गुजराती मंडळ पारितोषिक

५) सर गोविंद माडगांवकर पारितोषिक (कला)

६) सर गोविंद माडगांवकर पारितोषिक ( शास्त्र)

७) प्राचार्य गजेंद्रगडकर स्मरणार्थ पारितोषिक (कला)

८) प्राचार्य गजेंद्रगडकर स्मणार्थ पारितोषिक (शास्त्र)

याशिवाय इतर अनेक पारितोषिके व शिष्यवृत्त्या वेळोवेळी जाहीर करण्यात येत होत्या. त्याचा फायदा गरीब व हुषार विद्यार्थ्यांना होत होता. विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये आणखीन गती येण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणेसाठी आणि विद्यार्थ्यांचा तसेच संस्थेचा नावलौकीक होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी महाविद्यामध्ये शिष्यवृत्या व पारितोषिके ठेवली होती.

## *१.७ सिध्दार्थ कॉलेजची खास वैशिष्ट्ये*

### अ) सकाळचे महाविद्यालय :-

सिध्दार्थ महाविद्यालय सुरु करण्यामागे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रमुख उद्देश हा होता की, संपूर्ण देशातील अस्पृश्य समाजातील मुलांच्या हदयामध्ये शिक्षण घेण्याची उर्मी व इच्छा निर्माण व्हावी व प्रत्येक अस्पृश्य विद्यार्थ्याने उच्च शिक्षण घेण्यासाठी धडपड करावी .परंतू ब-याचशा अस्पृश्य मुलांना आर्थिक कारणामुळे उच्चशिक्षण घेणे जमत नसे म्हणून त्यांनी हे महाविद्यालय १९४६ पासूनच सकाळचे सुरु केले. त्याच्या मागे डॉ. आंबेडकरांची ही भूमिका होती की, गरीब, अस्पृश्य मागासलेल्या जातीतील

मुलांना आपली नोकरी धंदा, सांभाळून सकाळच्या वेळी आपले उच्च शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून त्यांनी अगदी सुरुवातीपासून सकाळचे कॉलेज सुरु केले. नोकरी करण्याचा किंवा आई वडिलांना मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांना सकाळचे महाविद्यालय ही एक सुवर्णसंधी मिळाली. आणि बरेचशे अस्पृश्य विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी सिध्दार्थ महाविद्यालयात गर्दी करु लागले म्हणून सकाळचे महाविद्यालय हे त्या काळी मुंबईत प्रसिध्द होते.[१७]

मागासवर्गियांची अर्थिक निकड हे त्यांच्या शिक्षणाचे प्रमुख सुत्र होते. शेती नसल्याने हा समाज दुय्यम दर्जाच्या व्यवसायातून उदरनिर्वाह चालवित असे. अर्थार्जनाच्या गरजेने काम करावेच लागे. अशा मुलांनी शिक्षणापासून परावृत्त राहू नये म्हणून त्यांनी ही सोय केलेली दिसते.

ब) कॉलेज संसद :-

कॉलेज संसद हे सिध्दार्थ महाविद्यालयाचे दुसरे महत्वाचे वैशिष्ट. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अशी इच्छा होती की महाविद्यालयातील आजचे विद्यार्थी हे भावी काळात भारत देशाचे पुढारी होतील. यासाठी आजच्या युवकांना संसदीय कामकाज पध्दतीचे प्रशिक्षण मिळावे म्हणून त्यांनी सिध्दार्थ महाविद्यालयात सुरुवातीपासून 'मूकसंसद' सुरु केलेली होती. त्यामुळे त्याचा फायदा बऱ्याच अंशी कॉलेज विद्यार्थ्यांना होत होता. राजकारणाचे धडे व प्रशिक्षण मिळत होते. सिध्दार्थ कॉलेज संसदमुळे संसदीय लोकशाही शासनव्यवस्था कशी असावी याचे प्रशिक्षण मिळत होते. तसेच भारतीय राज्यघटना, संसदेमध्ये चालणारी चर्चा, इ. बाबी बाबत मूकसंसदेमध्ये फायदा मिळत होता. काही वेळा स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूकसंसदेच्या पार्लमेंटला हजर राहत व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत त्यामुळे संसदीय घटनात्मक शासनव्यवस्था कशी असते याचे धडे महाविद्यालयात असतानाच विद्यार्थांना मिळत असत. "[१८]

<u>क) सिध्द संशोधन पत्रिका :-</u>

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास या विषयातील उच्चश्रेणीचे संशोधक होते . त्यांना सिध्दार्थ कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी संशोधन क्षेत्रात रस घ्यावा व भावी जीवनात संशोधन व्हावे व त्यांनी आपले शोधनिबंध महाविद्यालच्या 'सिध्द' या जनरलमध्ये प्रकाशित करावेत. महाविद्यालया मार्फत हे जनरल काढले जात होते. त्यामुळे महाविद्यालयातील काही विद्यार्थी-विद्यार्थींनी एखाद्या विषयावर वाचन करुन संबंधीत विषयाच्या प्राध्यापकाचे मार्गदर्शन घेऊन लेख छापले जात होते. यातूनच काही भावी संशोधन निर्माण झाले म्हणून बाबासाहेबांची ही दूरदृष्टी अतिशय महत्वाची होती. त्यामुळे इतर महाविद्यालयातील संशोधनपत्रिका निघू लागल्या आणि विद्यार्थ्यांचा संशोधन लालसेस वाव मिळू लागला ''
याचा संशोधनाच्या क्षेत्रातील व्यासंग प्रदीर्घ होता. संशोधनातून येणारे निष्कर्ष हे त्या संस्थाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरतात असे मत होते.

<u>*१.८ खेळाडूंना प्रोत्साहन*</u>

बौध्दीक क्षेत्राबरोबर आपल्या महाविद्यालयात उत्तम खेळाडू निर्माण व्हावेत म्हणून विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षक नेमण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये प्राविण्य व कौशल्य दाखविल्यामुळे महाविद्यालयातून विशेष पारितोषिके व शिष्यवृत्या दिल्या जात होत्या मुंबई विद्यापीठात या विद्यार्थ्यांनी खेळात नैपुण्य दाखवून पारितोषिके मिळविली होती.

<u>*सिध्दार्थ कॉलेजला नामांकीत व्यक्तींच्या भेटी :-*</u>

" सिध्दार्थ कॉलेज हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविले असल्यामुळे त्याची किर्ती सर्व भारत भर पसरली होती. आणि म्हणूनच अनेक नामांकीत व्यक्तीनी सिध्दार्थ कॉलेजला भेटी दिलेल्या दिसतात.

१७ डिसेंबर १९४७ हा दिवस सिध्दार्थ कॉलेजच्या इतिहासात महत्वाचा ठरला

कारण त्या दिवशी लेडी माऊंट बॅटन हीने या महाविद्यालयास भेट दिली व डॉ. आंबेडकरांना दिलेले वचन पूर्ण केले. तसेच १९४८ साली सी.पी. आणि बेरर प्रांताचे गव्हर्नर मंगलदास पकवासा यांनी या महाविद्यालयास भेट देऊन समाधान व्यक्त केले. तर १९४९ साली मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री बाळासाहेब खेर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु चिमणलाल सेटलवार, बांधकाममंत्री एम.व्ही. गाडगीळ, कामगारमंत्री गुलजारीलाल नंदा, सी.व्ही. रमण (आंतरराष्ट्रीय किर्तीचे शास्त्रज्ञ) यांनी भेटी दिलेल्या आहेत. याशिवाय कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरु आर. व्ही. जहागिरदार, जयप्रकाश नारायण यांनी १९५० साली भेटी दिल्या आहेत. तसेच प्र. के. अत्रे, दिनकरराव देसाई (शिक्षणमंत्री मुंबई), डी. के. कुमठेकर (मुंबई विधानसभा अध्यक्ष) इ. नी १९५५ मध्ये महाविद्यालयास भेटी दिल्या आणि १९५६ साली डॉ. राधाकुमार मुखर्जी (थोर इतिहासकार व इंडॉलॉजीस्ट) यांनी भेट दिली . [२०]

१.९ राष्ट्रविकासासाठी महाविद्यालयाचे योगदान

सिध्दार्थ महाविद्यालयातील कांही प्राध्यापक व विद्यार्थी यांनी भारत देशाच्या विकासात महत्वाचे योगदान दिल्याचे आपणास आढळून येते. प्रा. मधु दंडवते हे पदार्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख होते व काही काळ उपप्राचार्य होते, नंतर ते राजकारणात गेले. आणि बरीच वर्षे खासदार व काही काळ भारत सरकारचे रेल्वेमंत्री म्हणून काम केले. दुसरे एक या महाविद्यालयाचे प्राध्यापक अरुण दोंदे अर्थशास्त्र विभागप्रमुख पुढे ते महाविद्यालयाचे प्राचार्य झाले आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटी चे सदस्य व उपाध्यक्ष झाले व नंतर महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य (आमदार) झाले. कॉलेजमधील काही माजी विद्यार्थी पुढे भारताच्या राजकारणात व महाराष्ट्राच्या राजकारणात चमकलेले दिसतात. त्यापैकी काहीची नावे दादासाहेब रुपवते (माजी समाजकल्याण व गृहनिर्माण मंत्री), एन.एम. कांबळे (समाजकल्याण मंत्री, खासदार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष इंदिरा गांधीचे निष्ठावान), रामदास आठवले (माजी

समाजकल्याणमंत्री, खासदार ), बी. शंकरानंद (माजी केंद्रीय मंत्री) जे. डी. जाधव (आय.ए.एस. मुंबई कार्पोरेशनचे माजी कमिशनर तसेच मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश) व सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायाधीश पी.बी. सावंत हे सर्व सिध्दार्थ कॉलेजचे माजी विद्यार्थी होते.

डॉ. एस. डी. कर्णिक व डॉ. भालचंद्र मुणगेकर हे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु या महाविद्यालयाने दिले. तसेच सुप्रसिध्द नाटककार कमलाकर सारंग हे सुध्दा याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. तर खेळामध्ये विशेष प्रावीण्य मिळविलेले या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रामचंद्र देसाई, नरेंद्र ताम्हणे, अशोक मंकड, दिलीप सरदेसाई, एस. जे दिवादकर, रामनाथ पारकर, सुधीर नाईक, इ.नी क्रीडा क्षेत्रात नाव कमविले.

थोडक्यात पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सिध्दार्थ महाविद्यालय हेपहिले महाविद्यालय आणि डॉ. आंबेडकराच्या कारकीर्दीतच या महाविद्यालयाने शिक्षण, राजकारण, खेळ, नाटक इ. क्षेत्रात भरीव कामगिरी केली. भारत देशाच्या विकासात मोलाची कामगिरी केली.

## २) मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद (१९५०)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्यातील मागासलेल्या भागात औरंगाबाद येथे १९५० साली मिलिंद महाविद्यालय सुरु केले. त्या वेळच्या हैद्राबाद सरकारने हे कॉलेज सुरु करण्यासाठी जमीन व आर्थिक मदत दिली होती. हे कॉलेज आज मराठवाड्यातील एक प्रतिष्ठित कॉलेज म्हणून सुप्रसिध्द आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समोरच मिलिंद महाविद्यालय व त्याचा विस्तृत परिसर आहे. " मिलिंद कॉलेज म्हणजे औरंगाबाद शहराचा अलंकार "[२१] असे बाबासाहेब म्हणत असत. १६/९/१९५१ साली मिलिंद महाविद्यालय औरंगाबादच्या इमारतीचा कोनशिला बसविण्याचा कार्यक्रम झाला. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या भागात मिलिंद

महाविद्यालय का व कसे सुरु झाले याचा वृत्तांत त्यांनी आपल्या भाषणातून सांगितला ते म्हणाले,

"मिलिंद महाविद्यालय हे १९ जून १९५० रोजी अस्तित्वात आले आहे हे कॉलेज पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई या संस्थेने चालविले असून या संस्थेचे अध्यक्षपद माझ्याकडे आहे. ही सोसायटी १९४५ साली स्थापन करण्यात आली. साधारणपणे देशभर आणि मुख्यत्वे मागासलेल्या वर्गात उच्चशिक्षणाचा प्रसार करणे हे या संस्थेचे ध्येय व उदिष्ट आहे. या ध्येयानुसार मुंबईत १९४६ साली 'सिध्दार्थ' या नावाने एक कॉलेज उघडण्यात आले आहे. मला सांगावयास आनंद वाटतो की अवघ्या चार वर्षात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या देशी, विदेशी खेळ आणि शैक्षणिक दर्जा या सर्वच बाबतीत सिध्दार्थ कॉलेजने मुंबई राज्यात महत्वाचे स्थान पटकावले आहे. या महाविद्यालयात ८०० विद्यार्थी आहेत . दुसरीकडे विद्यार्थ्यांची एवढी मोठी संख्या क्वचितच आढळेल. आंतर कॉलेजच्या खेळात असा एकही प्रकार सापडणार नाही की ज्यात सिध्दार्थ कॉलेजने विजय मिळविला नाही. मुंबई विश्वविद्यापीठाच्या नामांकित शिष्यवृत्या व बक्षिसेही कॉलेजने हातून जाऊ दिली नाहीत. या चार वर्षाच्या अनुभवाने उत्तेजित झाल्यामुळे आपल्या कार्याचा पसारा इतर ठिकाणी आपण वाढवू शकू असे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाला वाटले.

हे कॉलेज उघडण्यासाठी हैद्राबाद संस्थानाचीच का निवड करण्यात आली असे कदाचित विचारण्यात येईल याचे कारण अगदी साधे आहे. शिक्षणाच्या बाबतीत हैद्राबाद संस्थान बरेच मागासलेले आहे. उच्चशिक्षणाच्या बाबतीत तर अगदीच मागासलेले आहे. हैद्राबाद संस्थानाचे क्षेत्रफळ चौऱ्याऐंशी हजार चौरस मैल असून एक कोटी साठ लाख लोकसंख्या आहे. मार्च १९४९ मध्ये संस्थानात एकूण १७ कॉलेज होती. शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ७७१५ होती. याची तुलना मुंबई राज्यातील स्थितीशी केली तर मुंबई राज्याचा विस्तार १ लाख १५ हजार ५७० चौरस मैल आणि लोकसंख्या ३ कोटी ३३

लाख ३१ मार्च १९५० रोजी येथील कॉलेजची संख्या ९० आणि एकूण विद्यार्थ्यांची संख्या ५०३५६ इतकी होती.

हैद्राबाद संस्थान उच्चशिक्षणाच्या बाबतीत किती मागे आहे हे या आकड्यावरुन दिसेल. हैद्राबाद संस्थानचा शैक्षणिक मागासलेपणा वगळला तरी खोलवर पाहिल्यास एक खेदकारक घटना दिसून येते. ती म्हणजे शैक्षणिक सवलतींची असमाधानकारक व असमर्थनीय विभागणी. जे काही थोडे बहूत उच्चशिक्षण हैद्राबाद संस्थानात दिसते ते फक्त हैद्राबाद शहरातच आहे. एकंदर १७ कॉलेज पैकी फक्त इंटरपर्यंत शिक्षण देणारी ३ कॉलेजस् सोडली तर बाकीची सगळी कॉलेजे हैद्राबाद या शहरातच आहेत. इंटरपर्यंत असलेल्या या ३ कॉलेजपैकी ८० लाख लोकवस्तीच्या तेलंगणा भागासाठी 'वरंगल' येथे एक आहे. ४५ लाख लोकवस्ती असलेल्या मराठी भागासाठी औरंगाबाद येथे आणि ३५ लाख लोकवस्ती असलेल्या भागासाठी कर्नाटक येथे तिसरे आहे.

ही उणीव भरुन काढण्यासाठी सोसायटीने हैद्राबाद संस्थानची निवड केली आणि औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालय सुरु केले. [२२] कॉलेजची वैशिष्ट्ये सांगताना पुढे डॉ. आंबेडकर म्हणतात,

" या कॉलेजमध्ये मुलांच्या बरोबर मुलीही शिक्षण घेत आहेत. सामाजिक मागासलेल्या आणि शिक्षणाचा गंधही नसलेल्या या भागात मुलांच्या बरोबरीने मुलींनाही शिक्षण देऊन कॉलेज एक नवीन पायंडा घालीत आहे. या कॉलेजमध्ये सर्व जातीच्या व धर्माच्या मुली शिक्षण घेत आहेत. मुलींच्या शिक्षणाला उत्तेजन मिळावे व मोठ्या संख्येने त्यांनी कॉलेजमध्ये यावे म्हणून शहरापासून कॉलेज पर्यंतची येण्याकरिता एक बसही ठेवली आहे. या कॉलेज मध्ये कोणत्याही प्रकारची जातीयता नसून सर्वांना द्वारे मोकळी आहेत.

अस्पृश्य आणि मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे हे कॉलेज खास लक्ष पुरवित.१९ जून १९५० साली हे कॉलेज सुरु झाले .त्यावेळी फक्त १४० विद्यार्थी होते.

आज विद्यार्थ्यांची संख्या ३३२ आहे जागे अभावी प्रवेश देणे बंद करणे पडत आहे." [२३]

*२.१ मिलिंद महाविद्यालयातील मंडळे :-*

सिध्दार्थ कॉलेज मुंबई प्रमाणे मिलिंद महाविद्यालयात सुध्दा विद्यार्थी व प्राध्यापकांच्या बौध्दीक विकासास चालना मिळण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालील मंडळे सुरु केली,

१) सांस्कृतिक मंडळ (९ ऑगस्ट १९५०) २) सायन्स मंडळ ( १९५०)

३) समाजसेवा संघ (१९५०) ४) वाणीज्य मंडळ ( १९५२)

५) इंग्रजी साहित्य मंडळ ( १९५२) ६) मराठी मंडळ ( १९५३)

७) कला सर्कल ( १९५३) ६) सामाजिक शास्त्र चर्चा मंडळ ( १९५२) "

*२.२ जिमखाना :-*

मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकासा बरोवर शारीरिक विकास होण्यासाठी मिलिंद महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्राकडेही लक्ष पुरविले. या महाविद्यालयाला प्रशस्त क्रिडांगण असून फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, सायकलपोलो, बॅडमिंटन, हुतुतु, टेबलटेनिस, कॅरम, इ. देशी विदेशी खेळांची सोय केलेली होती. त्याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला.

*२.३ कॉलेज संसद :-*

सिध्दार्थ महाविद्यालयाप्रमाणे मिलिंद महाविद्यालयामध्ये सुध्दा डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने कॉलेजमध्ये कॉलेज संसद सुरु केली विद्यार्थ्यांना घटनात्मक राज्यकारभाराचे प्रशिक्षण मिळावे हा त्यांचा हेतू होता. या संस्थेचे उदघाटन १५ ऑगस्ट १९५३ साली हैद्राबाद प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष व थोर स्वातंत्र्य सेनानी रामानंदतीर्थ यांच्या हस्ते करणेत आले. त्यांनी या नवीन उपक्रमाचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आपल्यामध्येच विविध पक्ष स्थापन केले, संसदेचा अध्यक्ष कसा निवडला जातो, विरोधी पक्ष नेता कसे काम करतो, अधिवेशने कशी चालतात, मंत्री कसे उत्तर देतात याचे

प्रशिक्षण या कॉलेज संसद मधून विद्यार्थ्यांना मिळू लागले त्याचा फायदा त्यांना भावी आयुष्यात झाला. [२५]

## *२.३ मिलिंद महाविद्यालयास नामांकित व्यक्तींच्या भेटी :-*

१) सरदार वल्लभभाई पटेल व

त्यांची मुलगी मणिबेन (उपपंतप्रधान आणि गृहमंत्री भारत सरकार)

२) गोपालस्वामी अय्यंगार (दळवळणमंत्री, भारत सरकार)

३) रामकृष्णराव (शिक्षणमंत्री, हैद्राबाद) ४) शेषाद्री (गृहमंत्री, हैद्राबाद)

५) श्री. एम. के वेलोदी (मुख्यमंत्री, हैद्राबाद ) ६) बाबासाहेब परांजपे

७) काशीनाथराव वैद्य (स्पीकर, हैद्राबाद असेंब्ली) ८) डॉ. जी.एम श्रॉफ

९) व्ही. डी. देशपांडे (विरोधी पक्षनेता, हैद्राबाद) १०) गोविंदभाई श्राफ

११) दिगंबरराव विंदू (गृहमंत्री, हैद्राबाद ) १२) श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

१३) एस.एस. भाटीया १४) श्री. वा.रा. कांत (कवी) १५) शाहीर रेणापूरकर

१६) एल.जी. राजवाडे (कलेक्टर औरंगाबाद ) १७) आर.पी. पारनेरकर

१८) डॉ. एस. ए. रझवी १९) जी. एन. धत्रे २०) हरिंद्रनाथ चटोपाध्याय

आणि भारताचे पंतप्रधान श्री. पंडित जवाहरलाल नेहरु इ. मान्यवरांनी मिलिंद महाविद्यालयास भेटी देवून महाविद्यालयाचे कौतुक केले. [२६]

## *३) सिध्दार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲंड इकॉनॉमिक्स-मुंबई (१९५३)*

मुंबई मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीने जून१९५३ साली 'सिध्दार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स महाविद्यालय' सुरु करुन वाणिज्य शिक्षणाची सोय करण्यात आली. त्यावेळचे शिक्षण मंत्री (मुंबई राज्य) दिनकरराव देसाई यांनी काही तांत्रिक अडचण बाजूला करुन या महाविद्यालयास परवानगी दिली. त्यामुळे अनुसूचीत जाती जमाती व इतर मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांची वाणिज्य शिक्षणाची सोय झाली.

या महाविद्यालयाचा उद्‌घाटन समारंभ २७ जून १९५३ रोजी मंगलदास पकवासा मुंबईतील प्रसिध्द व्यक्ती व मध्यप्रदेशचे राज्यपाल यांच्या हस्ते झाला. या महाविद्यालयाचे प्राचार्य जी. आर. दळवी यांनी स्वागतपर भाषण केले. आणि या महाविद्यालयाचा इतिहास सांगितला. मुंबईमध्ये वाणिज्य महाविद्यालयाची गरज असल्यामुळे हे महाविद्यालय मुंबईत सुरु केले असे सांगून ते म्हणाले,

``This new Institution is a contribution made by people's education Society to the spread & progress of education in Bombay. The College has been established as a result of the keen interest & urgefelt by Dr. Ambedkar, the chairman of the society to promote education particularly amongst the backward classes. A city of Bombay with a population of about thirty lacks & commercial centre of international importance was certainly in need of an additional commerce college Hundreds of students seeking admission to the commerce cources of studies they did not want to or were deprived of Highter education altogether " [२७]

महाविद्यालयात १९५३ साली एफ. वाय. बी. कॉम साठी १८८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आणि १९५६ साली बी. कॉम. भाग तीन ची पहिली तुकडी बाहेर पडली. या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य डॉ. जी. आर. दळवी झाले. ते १९५६ साली इंग्लडला अभ्यास दौऱ्यावर गेले. त्यानंतर १० वर्षे प्रोफेसर जे. सी. बहाल हे या कॉलेजचे प्राचार्य होते.

## *३.१ कॉलेजचे माजी विद्यार्थी*

या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

क्षेत्रात चांगले नाव कमविले त्या पैकी व्ही.बी. शिंदे हे अनुसूचित जातीतील विद्यार्थी पुढे नामांकित चार्टर अकाऊंट (सी. ए.) झाले. बी. एच. दानी आणि पी. ए. बेडका यशस्वी उद्योगपती बनले. सौ. अरुणा नेगल्ली (सी. ए.), एन. एन. नावडे एल. आय. सी. चे विभागीय अधिकारी बनले. श्री. पी. पी. भट्ट हे कार्पोरेशन बँकेचे डेप्युटी मॅनेजर बनले. उपेंद्र त्रिवेदी हे गुजराती फिल्म मध्ये सुप्रसिध्द नट बनले. श्री. रमेश डी. महाडेश्वर हे आय.ए.एस. अधिकारी बनले. अशा रितीने या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी पुढे उद्योगपती व वाणिज्य क्षेत्रातील अधिकारी बनलेले दिसतात. [२८]

*३.१ मान्यवरांच्या भेटी*

आमदार एस.के. पाटील यांनी १९५५ मध्ये या महाविद्यालयात भेट दिली. दुर्गा भागवत (सुप्रसिद्ध मराठी लेखिका) यांनी मराटी वाङःमय मंडळाचे उद्घाटन केले. शिवाय एम.व्ही. दोंदे (महापौर मुंबई), एस.के. वानखेडे (महाराष्ट्र राज्याचे नियोजन विकास, उद्योग व विजमंत्री ) यांनी भेट दिली होती.

*३.२ महाविद्यालयातील मंडळे*

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी या महाविद्यालयामध्ये खालील अभ्यासमंडळे सुरु केलेली होती.

१) कॉमर्स मंडळ २) साहित्य आणि चर्चा मंडळ ३) गुजराथी साहित्य मंडळ
४) हिंदी साहित्य मंडळ ५) मराठी वाङःमय मंडळ इ. मंडळे होती. इतर महाविद्यालयाप्रमाणे हे महाविद्यालय आज सुद्धा मुंबई विद्यापीठात एक नामंकित शिक्षण संस्था असून बरेचसे विद्यार्थी या महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी गर्दी करतात.

## ४) सिद्धार्थ विधी महाविद्यालय मुंबई १९५६

वाणिज्य, कला, शास्त्र शाखेच्या अभ्यासाची सोय झाल्यानंतर पीपल्स एज्युकेशन सोसायटीला असे वाटले की आपण एखादे विधी महाविद्यालय सुरु करावे म्हणून २५ जून १९५६ साली सिद्धार्थ लॉ कॉलेज मुंबईमध्ये डॉ. आंबेडकरांनी सुरु केले. हे त्यांच्या

हयातीत त्यांनी सुरु केलेले शेवटचे कॉलेज ठरले .या महाविद्यालयात एल.एल.बी. चा कोर्स सुरु केला. हे महाविद्यालय सकाळचे असल्याने विद्यार्थ्यांची गर्दी वाढू लागली. या महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी पुढे नामांकीत कायदेपंडित बनले.

या महाविद्यालयाचे प्राचार्य दळवी हे होते. प्रा.हेलेकर, प्रा.शेख, प्रा.कोठारे, प्रा.बी.सी.कांबळे, प्रा.आर.डी. भंडारे, प्रा.जॉर्ज, प्रा.खरे, प्रा.भस्मे हे सर्वजण नोव्हेंबर १९५६ पासून या महाविद्यालयाच्या सेवेत रुजू झाले. व नंतर त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाढीसाठी तन-मन-धन खर्च केले.

आज मुंबई विद्यापीठातील एक नामांकीत विधी महाविद्यालय म्हणून सिद्धार्ष विधी महाविद्यालयाकडे पाहिले जाते. बरेचशे विद्यार्थी या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे महानिर्वाण ६ डिसेंबर १९५६ साली झाले, परंतु त्यांनी सुरु केलेले शैक्षणिक कार्य पीपल्स एज्युकेशन सोसायटीने सुरु केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर सुद्धा तितक्याच वेगाने संस्थेचा विस्तार तितक्याच नाम लौकीकाने पुढे नेण्याचे काम डॉ.आंबडेकरांच्या सहकाऱ्यांनी केले.तळागाळातील मुलांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. हे डॉ.आंबेडकरांचे कार्य पुढे तेवढ्याच जबाबदारीने नेले. काही नविन संस्था सुद्धा काढलेल्या आहेत. त्यांचा याठिकाणी फक्त नामोल्लेख केला आहे.

१) सिद्धार्थ नाईट हायस्कूल, मुंबई

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, वडाळा

३) सिद्धार्थ विहार होस्टेल, दादर मुंबई

४) द कॉलेज ऑफ जर्न्यलिझम, मुंबई

५) सिद्धार्थ इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, मुंबई

६) डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, वडाळा

७) पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्कूल, न्यू मुंबई

८) पीपल्स एज्युकेशन सोसायटी सेंट्रल स्कूल, सी.बी.डी.

९) मिलिंद कॉलेज ऑफ कॉमर्स, औरंगाबाद

१०) डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स , औरंगाबाद

११) डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, औरंगाबाद

१२) मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, औरंगाबाद

१३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्टस् ,सायन्स् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, महाड

१४) देवी रमाबाई आंबेडकर विद्यार्थी आश्रम, दापोली.

याशिवाय पुणे, नांदेड आणि कोल्हापूर या ठिकाणी शैक्षणिक संस्था उघडण्यासाठी संस्थेचे प्रयत्न चालू आहेत.[२९]

थोडक्यात महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्था, विवेकानंद शिक्षण संस्था (कोल्हापूर), डेक्कन एज्युकेशन सोसायटी (पुणे), शिवाजी शिक्षण संस्था अमरावती याप्रमाणे पीपल्स एज्युकेशन सोसायटी शिक्षण क्षेत्रात भरीव काम करीत आहे. या संस्थेस शैक्षणिक क्षेत्रात विशेष आदराचे स्थान आहे. भारतातील सर्व मागासलेले विद्यार्थी, प्राध्यापक,समाज ही संस्था आपली आहे म्हणूनच संस्थेकडे आदराने पाहतात.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जिवंत स्मारक आहे.अशा आदराने या संस्थेकडे सर्वजण पाहतात.या संस्थेमुळे कला,वाणिज्य,विज्ञान,विधी इ. शाखांचा अभ्यास करणारी महाविद्यालये स्थापन केली गेली. यामुळे मागासवर्गिय आणि इतर उच्चवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली.विशेष करुन शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या मराठवाडा विभागात शैक्षणिक संस्थेचे जाळे पसरुन तेथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय डॉ.आंबेडकरांनी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० पासून १९५६ पर्यंत म्हणजे त्यांच्या महानिर्वाणा पर्यंत जसे शिक्षणाबाबतचे विचार मागासवर्गीय

समाजाला सांगितले. त्याचबरोबर स्वत:चीही पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करुन बोललेला विचार कृतीत आणला. या शिक्षण संस्थेतून महाराष्ट्रातील आणि देशाच्या इतर भागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन देशाच्या विकासात मोलाची भर घातलेली दिसते. आणि डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक स्वप्न काही अंशी पूर्णत्वाकडे गेले असे म्हणावे लागेल.

## संदर्भ साधने

१) पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा १९४५-४६ चा अहवाल, सिध्दार्थ कॉलेज, मुंबई.

२) पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे दप्तर, मुंबई.

३) डॉ.नरवडे एस.एस. डॉ. आंबेडकर आणि हैद्राबाद संस्थान, सुगावा प्रकाशन पुणे, पृष्ठ ६३.

४) पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे दप्तर घटना.

५) कीर धनंजय, डॉ.बाबासाहेव आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९८५, पृष्ठ ३९३.

६) पीपल्स एज्युकेशन सोसायटीची घटना दप्तर मुंबई.

७) कित्ता

८) शंकरराव खरात (संपादक) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी प्रकाशन पुणे १९८७.

९) स्मरणिका मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद.

१०)पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे दप्तर घटना.

११)सिध्दार्थ कला आणि शास्त्र महाविद्यालयाची वार्षिक अंक मार्च १९४७ पृ.१ .

१२)कित्ता

१३) सिध्दार्थ कला आणि वाणीज्य महाविद्यालय वार्षिक अंक १९५२ पृ.१.

१४) सिध्दार्थ कॉलेज मुंबईचे वार्षिक अंक १९४७ ते १९५३.

१५) कित्ता

१६) कित्ता

१७) किता.

१८) सिध्दार्थ कला आणि शास्त्र महाविद्यालयाचे वार्षिक अंक मार्च १९४८ पृ. ९.

१९) पीपल्स एज्युकेशन सोसायटी रौप्यमहोत्सव अंक १९४५-७३.

२०) सिध्दार्थ कला व शास्त्र महाविद्यालय मुंबई वार्षिक अंक १९४७-५६.

२१) जनता १६ सप्टेंबर १९५१.

२२) मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद च्या इमारतीची कोनशिला वसविण्याचा समारंभ प्रसंगीचे भाषण ( जनता १६/९/१९५१).

२३) कित्ता

२४) मिलिंद महाविद्यालय वार्षिक अंक, १९५३.

२५) कित्ता

२६) डॉ. नरवडे एस.एस. डॉ.आंबेडकर आणि हैद्राबाद संस्था, सुगावा प्रकाशन पुणे, पृ.७२ ने ७३.

२७ )सिध्दार्थ वाणीज्य आणिअर्थशास्त्र महाविद्यालय वार्षिक अंक, मुंबई १९५३ - ५४ पृ.४.

२८) सिध्दार्थ वाणीज्य आणिअर्थशास्त्र महाविद्यालय रौप्यमहोत्सवी अंक मुंबई .

२९) पीपल्स एज्युकेशन सोसायटी दप्तर मुंबई .

## प्रकरण चौथे

# डॉ.आंबेडकरांचे शिक्षणातील सहकारी आणि वृत्तपत्रे

## १) शैक्षणिक कार्यातील सहकारी

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तारीख १९४५ साली मुंबई मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापना केली आणि त्या शिक्षण संस्थेद्वारे त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य सुरु केले. कला, वाणिज्य, शास्त्र, विधी महाविद्यालये सुरु केली. त्यावेळी मागासलेल्या वर्गातील शिक्षक मिळणे कठीण होते. त्याचबरोबर त्यांची ही शिक्षण मोहिम राबविण्यासाठी त्यांना विश्वासू सहकाऱ्यांची गरज होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे कार्य समाज परिवर्तनाचे असल्याने त्यांना त्यांच्या कार्यावर निष्ठा ठेवणारे सहकारी मिळाले आणि या सर्व शिक्षणसंस्था नावा रुपाला आल्या. त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये श्री.डी.जी.जाधव, रावबहादूर भोळे, जस्टीस आर.आर.भोळे, बॅरिस्टर एम.बी.समर्थ, प्रो.व्ही.जी.राव, श्री.जी.टी.परमार (गुरुजी), श्री.बी.एच.वराळे, श्री.सी.एम.मोहिते गुरुजी, श्री.आर.डी.कोवळी, श्री.एस.जी.टिपणीस, श्री.बी.बसवलिंगाप्पा, श्री.यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर, प्रा.अनंत काणेकर, प्राचार्य एम.बी.चिटणीस, श्री.एस.एम.ढिवरे, श्री.कृष्णाजी भिकाजी तळवटकर, एस.पी.गायकवाड, डॉ.जे.व्ही.देशपांडे, श्री.पी.टी.बोराळे, ॲड.एम.व्ही.राव, श्री.एस.एस.रेगे, ॲड.चंद्रकांत अधिकारी, श्री.एस.बी.तांबे, एस.एस.मोरे, एस.के.महागावकर, के.एच.रंगनाथ, डॉ.विमल शहारे आणि एस.एल.खोत यांचे योगदान महत्वपूर्ण होते.यातील काही निवडक सहकाऱ्यांच्या कार्याचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न करीत आहे.

### १) श्री.डी.जी.जाधव

श्री.डी.जी.जाधव हे डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक व समाज कार्यात पहिल्यापासून सहभागी होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य आणि विश्वस्त म्हणूनही श्री.डी.जी.जाधव यांनी काम पाहिले आहे. तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे १९६३ पासून १९६९ पर्यंत ते २ वेळा अध्यक्ष होते.श्री.जाधव यांनी मुंबई, औरंगाबाद, महाड येथील संस्थेची जवळजवळ १० महाविद्यालये चालविण्याची जबाबदारी पेलली होती.

श्री.जाधव हे अनुसूचित जातीमधील शिकलेल्या मध्ये पहिल्या पिढीतील कार्यकर्ते असून डॉ.आंबेडकरांनी आपल्या कामात त्यांना समाविष्ठ करुन घेतले. ज्यावेळी डॉ.आंबेडकर स्वत: भारत सरकारच्या व्हाईसरॉयच्या कौन्सील मध्ये मजूरमंत्री असताना डी.जी.जाधव हे डॉ.आंबेडकरांच्या कार्याकडे आकर्षित झाले. श्री.जाधव हे अविश्रांतपणे काम करणारे कार्यकर्ते होते. त्यांनी १९६३ साली मागासवर्गीयांची पहिली महाराष्ट्र निराश्रीत युवकांची परिषद पुणे येथे घेतली. १९३७-४२ या काळात मुंबई विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. मागासवर्गीयांच्या चार सदस्यीय विशेष समितीमध्ये ते होते. यामार्फत २५ लाख सरकारी अनुदान हे मागासवर्गाच्या भूमीहीन मजूरांच्या कल्याणासाठी वापरायचे होते. त्याचा त्यांनी योग्य विनिमय केला. नंतर ते काही काळ रेल्वेमध्ये अधिकारी पदावरती होते. रेल्वे मंत्रालयाचे सल्लागार म्हणून ही त्यांनी काम केले. १९४५मध्ये पॅरिस येथे भरलेल्या कामगार परिषदेला भारत सरकार मार्फत हजर राहिले. तसेच सहा महिने लंडनला कामगार प्रशिक्षणासाठी गेले होते. श्री.जाधव हे जवळ जवळ२४ वर्षे भारत सरकारच्या वेगवेगळया खात्यात कार्यरत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय विश्वासू सहकारी व अनुयायी म्हणून श्री.डी.जी.जाधव यांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय योजना राबविण्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मदत झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात त्यांनी त्यांच्या शैक्षणिक कार्याची धुरा समर्थपणे उचलली होतीच पण डॉ.आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर हीच दिशा ठेऊन कार्य केले.[१]

## २. श्री.रावबहाद्दूर भोळे

श्री.राबबहादूर भोळे हे किट्टीभंडारी समाजातील असून त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील 'पालशेत' येथे १८६९ साली झाला होता. ते एक समाजसुधारक आणि मागासवर्गीय समाजाच्या कल्याणासाठी झटणारे कार्यकर्ते होते. त्यांनी आपली सर्व हयात मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी खर्ची घातली.मुंबई महानगरपालिकेचे ते १२

वर्षे नगरसेवक होते. तर १६ वर्षे मुंबई विधानपरिषदेचे सदस्य होते. तसेच मराठा ऐक्य सभेचे ९ वर्षे सचिव होते. त्याचबरोबर 'किट्टे ऐक्यवर्धक मंडळी' चे ते संस्थापक होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व इतर सामाजिक कामात ते पहिल्यापासून भाग घेत होते. ज्यावेळी डॉ.आंबेडकर मॅट्रिक परिक्षा पास झाले म्हणजे १९०७ पासून रावबहादूर भोळेंचा त्यांच्याशी संबंध आला. भोळेंच्या मुळे डॉ.आंबेडकरांना महाविद्यालयीन शिक्षणास प्रोत्साहन व आर्थिक मदत मिळाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व शैक्षणिक उपक्रमामध्ये श्री.रावबहादूर भोळे हिरीरीने भाग घेत असत. काही वेळी डॉ.आंबेडकर त्यांच्यावरती एखादी जबाबदारी टाकीत असत तेव्हा ते अत्यंत प्रामणिकपणे ती जबाबदारी पार पाडत असत.[२]

## ३. न्यायमूर्ती आर.आर.भोळे (बी.एस्सी.एल.एल.बी.)

न्यायमूर्ती आर.आर.भोळे म्हणजे राजा राम भोळे यांचा जन्म जुन्या हैद्राबाद संस्थानात झाला होता. त्यांचे शिक्षण सुद्धा हैद्राबाद येथे झाले. १९३५ साली पहिल्यांदा डॉ.आंबेडकरांच्या सान्निध्यात आर.आर.भोळे आले. १९३५साली पुण्यामध्ये त्यांनी दलित युवकांची परिषद आयोजित केली होती आणि ते स्वत: स्वागत समितीचे अध्यक्ष होते. तर डॉ.आंबेडकर हे अध्यक्ष होते. १९३७ साली झालेल्या मुंबई विधानसभेवरती भारतीय मजूर पक्षाच्या (इंडियन लेबर पार्टी) तिकिटावरती निवडून आले. विधानसभेमध्ये सर्वात तरुण आमदार म्हणून आर.आर.भोळे यांच्याकडे पाहिले जात होते. डॉ.आंबेडकरांच्या अनुपस्थितीमध्ये ते विधानसभेत पक्षनेता म्हणून काही काळ काम पाहिले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी भारत सरकार ने प्रतिनिधी म्हणून इंग्लंड, अमेरिका, कॅनडा येथे गेले होते. १९४५ साली आंतरराष्ट्रीय कामगार परिषद फिलाडेल्फीया येथे भरली होती. तेथे ते भारतीय मजूर पक्षाच्या वतीने गेले होते. त्यांनी पहिल्यापासून भारतीय मजूरांच्या प्रश्नामध्ये रस घेऊन ते सोडवण्यासाठी प्रयत्न केले. ते अखिल भारतीय म्युनसिपल कामगार संघटनेचे अध्यक्ष होते. तर रेल्वे कामगार फेडरेशनचे उपाध्यक्ष होते.

१९५५ साली ते जिल्हा न्यायाधीश झाले. न्याय खात्यामध्ये त्यांनी विविध समितीवरती काम केले. मुंबईतील सीटी सिव्हिल कोर्टात न्यायाधीश म्हणून काही काळ काम केले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आर.आर.भोळे यांच्यावर पडली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत औरंगाबाद येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय सुरु केले. शेवटी ते नागपूर हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून काही काळ काम केले. डॉ.आंबडेकरांचे अपुरे शैक्षणिक कार्य आपल्या अध्यक्षीय कारकिर्दीत त्यांनी केले. त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी तन-मन-धन खर्चून तीला नावारुपाला आणले.[३]

## ४. बॅरिस्टर एम.बी.समर्थ

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक सदस्यामध्ये बॅ.एम.बी.समर्थ यांचा समावेश होता. १९५६ साली डॉ.आंबेडकरांनी बॅ.समर्थ यांना पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे प्रथम उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली. ते १९६२ पर्यंत संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून काम पहात होते. ते त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे २६ ऑगस्ट १९७७ पर्यंत पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त व कार्यकारी मंडळाचे ते महत्वाच्या सदस्यापैकी एक होते.

बॅ.एम.बी.समर्थ यांचा जन्म १८ मे १९०२ साली ठाणे येथे झाला. त्यांचे वडिल न्यायदान खात्यात काम करीत होते. बॅ.समर्थ हे मुंबई विद्यापीठाचे राज्यशास्त्र व इतिहास विषय घेवून पदवीधर झाले. नंतर त्यांनी एल.एल.बी.पूर्ण केली. १९२७ साली ते इंग्लडमध्ये बॅरिस्टरच्या शिक्षणासाठी गेले होते. तेथून ते बॅरिस्टरची पदवी घेवून आले. त्यांचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संबंध मुंबई हायकोर्टात आला. डॉ.आंबेडकर यांनी त्यांना सहकारी म्हणून घेतले नंतर त्यांची स्वतंत्र मजूर पक्षाचे महासचिव म्हणून नेमणूक केली. १९३७ साली या पार्टीचे मुंवई विधानसभेत १६ आमदार निवडून आले. त्यात आंबेडकरांच्या बरोबर बॅ.समर्थ यांचाही वाटा महत्वाचा होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यामध्ये सुरुवातीपासूनच बॅ.समर्थ यांनी लक्ष घातले होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या दैनंदिन कामामध्ये बॅ.समर्थ यांनी लक्ष घातले होते,त्यामुळे ही संस्था नावारुपाला आली. त्यांनी सर्व आयुष्य दुर्लक्षित समाजाच्या उन्नतीसाठी घालविले. त्यांचे २६ ऑगस्ट १९७७ रोजी निधन झाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण संस्था तसेच मजूर पक्षाची जडणघडण व या सर्वातून समाजपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण घेऊन मोक्याच्या जागा पिळविल्या खेरीज मागासवर्गीयांचे परिवर्तन होणार नाही याची त्यांना जाणीव असल्याने शिक्षणसंस्था निर्माण करण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. [४]

## ५.प्रोफेसर व्ही.जी.राव

प्रा.व्ही.जी.राव हे सुरुवातीपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी आणि जवळचे मित्र होते. त्यांचा पीपल्स एज्युकेशन सोसायटीशी अगदी स्थापनेपासून संबंध आलेला होता. २४ सप्टेंबर १८८८ साली प्रा.राव यांचा मुंबईत जन्म झाला. त्यांचे शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेजमधून झाले. १९०८ साली ते पदवी परिक्षा पास झाले व इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी गेले. सेंट जोन्स कॉलेज केंब्रिज येथे त्यांनी प्रवेश घेतला. केंब्रिजला शिक्षण घेत असताना त्यांचा भारतातील तीन महत्वाच्या व्यक्तींशी संबंध आला आणि त्यांच्या जीवनाला नविन वळण मिळाले. त्या तीन व्यक्ती म्हणजे पं.जवाहरलाल नेहरु, श्री.श्रीप्रकाश, श्री.व्ही.एन.चंदावरकर, प्रा.राव यांना फ्रेंच भाषेविषयी खास आकर्षण होते व त्यामध्ये त्यांनी विशेष प्राविण्य मिळविले होते. फ्रेंच भाषेचा त्यांचा सखोल अभ्यास होता. १९१३ साली केंब्रिज विद्यापीठातून त्यांनी एल.एल.बी. पदवी संपादन केली आणि १९१४ साली ते बॅरिस्टर झाले. इंग्लंडहून परत आल्यानंतर ते मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये फ्रेंच भाषेचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तसेच काही काळ विल्सन कॉलेज मध्येही ते फ्रेंच भाषा शिकवू लागले. प्रा.राव हे मुंबई विद्यापीठाचे कला शाखेचे अधिष्ठाता होते. तर काही काळ मुंबई नगरपालिकेचे ते नगरसेवकही होते.

श्री.राव यांचा पीपल्स एज्युकेशन सोसायटीशी जवळचा संबंध होता.

१९५३ साली ते पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व विश्वस्त म्हणून निवडले गेले. त्यांनी सिद्धार्थ कॉलेज व इतर पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेजमध्ये बक्षिसे, शिष्यवृत्या, पदके आपल्या स्वत:च्या पैशातून देत असत. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या जडणघडणीत व शैक्षणिक कार्यामध्ये मनापासून तळमळीने काम करणारे एक प्राध्यापक म्हणून त्यांची गणना होत होती. डॉ.आंबेडकर आणि त्यांचे १९२७ पासूनचे जवळचे संबंध होते. डॉ.बाबासाहेब आंबडेकर त्यांच्यावरती काही जबाबदाऱ्या टाकीत त्या त्यांनी प्रामाणिकपणे पूर्ण केलेल्या आहेत.[५]

## ६.आर.डी.कोवळी

श्री.आर.डी. कोवळी हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील एक जवळचे सहकारी व स्नेही होते. सुरुवातीला सिद्धार्थ कला व शास्त्र महाविद्यालयाच्या कार्यकारी समितीचे ते सदस्य होते. त्यानंतर पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य बनले.

मागासलेल्या व अनुसूचित जातीच्या उन्नतीसाठी त्यांनी प्रयत्न केले.तसेच स्वतंत्र मजूर पक्षाचे ते सक्रिय सदस्य होते. 'समाज समता संघ' या संस्थेशी त्यांचे जवळचे संबंध होते. १९२७ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 'महानगरपालिका कामगार संघ' स्थापन केला होता. त्याचे कोवळी हे सक्रिय सदस्य म्हणून काम पहात होते. महानगरपालिकांच्या गरीब कामगारांच्या प्रश्नासाठी ते भांडत असत. म्हणून त्यांना विनोदाने 'गरीब माणसांचा वकील' असे संबोधले जात.

आंबेवाडी मंदिर सत्याग्रह,नाशिक येथील काळाराम सत्याग्रह,महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह यामध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला होता.सुरुवातीपासून ते पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कामात भाग घेत होते.११जानेवारी१९६९ साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे ते उपाध्यक्ष झाले.संस्थेच्या शैक्षणिक कार्यात त्यांनी मोठे योगदान दिले.[६]

## ७.प्राचार्य एम.बी.चिटणीस

प्राचार्य एम.बी. चिटणीस यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून पाहिले जाते. १४ नोव्हेंबर १९०७ साली मुरुड जिल्हा कुलाबा येथे त्यांचा जन्म झाला. १९३१ साली इंग्रजी विषय घेऊन ते पदवीधर झाले आणि पुढे १९३४ साली इंग्रजी व मराठी विषय घेऊन ते एम.ए.परिक्षा पास झाले. एम.ए.च्या परिक्षेत ते मुंबई विद्यापीठात दुसरे आले.ते काही काळ सिद्धार्थ कॉलेजमध्ये मराठी विभागात विभागप्रमुख म्हणून काम केले. नंतर मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद या महाविद्यालयाचे ते पहिले प्राचार्य झाले, नंतर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद चे ते पहिले रजिस्ट्रार होते.

प्राचार्य चिटणीस यांनी अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली, अरब देश इ. देशांना भेटी देऊन तेथील शैक्षणिक संस्थांचा अभ्यास केला आणि औरंगाबाद सारख्या मागासलेल्या भागात शिक्षण प्रसाराचे कार्य केले. मराठवाडा विद्यापीठात एक उत्तम शिक्षक म्हणून त्यांना महाराष्ट्र शासनाने १९७२ ला उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार दिला.सरकारने त्यांचा 'दलितमित्र' पुरस्कार देऊन गौरव केला. १९७८ साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापकीय मंडळाने सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. पुढे १९८० साली त्या संस्थेचे उपाध्यक्ष बनले. मिलींद महाविद्यालयाचे प्राचार्य चिटणीस हे मराठवाडा विद्यापीठाचे रजिस्ट्रार झाले म्हणजेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीने महाराष्ट्राच्या मागासलेल्या भागाला शिक्षणतज्ञ व व्यवस्थापकीय नेतृत्व पुरविले. [७]

## ८. श्री.कृष्णाजी भिकाजी उर्फ घनश्याम तळवटकर

श्री.के.बी.तळवटकर हे सेक्रेटरी होते.यांना घनश्याम तळवटकर असे म्हणत असत.त्यांचा जन्म ५ एप्रिल१९२२ साली हरवीत ता.श्रीवर्धन जिल्हा कुलाबा येथे झाला. मुंबईमध्ये एम.ए.एल.एल.बी. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले. १९५३ साली सिद्धार्थ कॉलेजचे ते रजिस्ट्रार झाले. के.व्ही.चित्रेंच्या निवृत्तीनंतर श्री.तळवटकर हे पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे महासचिव म्हणूनही काम पहात होते. मुंबई १९५६ साली सिद्धार्थ महाविद्यालय

या सोसायटीने नव्याने चालू केले. त्याचेही ते रजिस्ट्रार झाले. जानेवारी १९५८ पासून पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून तळवटकरांनी कार्यभार स्वीकारला होता.

श्री. तळवटकर सिद्धार्थ कॉलेजचे विद्यार्थी, रजिस्ट्रार व शेवटी पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सचिव बनले. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या प्रगतीत त्यांचा फार मोठा वाटा आहे.[८]

## ९. श्री एस.जी.टिपणीस

जुन्या पिढीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एक जवळचे सहकारी म्हणून एस.जी.टिपणीस यांचा उल्लेख करावा लागेल. दलितांच्या उद्धारासाठी ते आंबेडकरांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यक्रमात नेहमी अग्रभागी असत. टिपणीस हे महाड या गावचे मूळ रहिवाशी होत. महाड नगरपालिकेचे ते काही काळ अध्यक्षही होते. महाड नगर पालिकेचे अध्यक्ष असताना १९२७ साली महाडचा चवदार तलाव अस्पृश्यांना खुला करण्याचा ठराव पास केला होता. महाडच्या सत्यागृहातील ते एक अग्रभागी नेते होते. या चळवळीबरोबर अनेक चळवळीमध्ये डॉ.आंबेडकरांच्या खांद्याला खांदा लाऊन त्यांनी भाग घेतला होता. टिपणीस हे स्वतंत्र मजूर पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते होते. १९३० साली त्यांना स्वातंत्र्य चळवळीत अटक झाली होती. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही ते अग्रभागी होते. त्यांच्या प्रयत्नामुळे महाडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणार्थ कॉलेज स्थापन झाले. एस.जी.टिपणीस हे ३ वर्षे पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष होते. महाडमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे ते काम पहात होते.[९]

## १०. यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर

यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चिरंजीव होते. आपल्या वडिलांच्या शैक्षणिक व सामाजिक कामात प्रकर्षाने सहभागी होत होते. १९७० साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळात त्यांची निवड झाली. वडीलांप्रमाणेच भैय्यासाहेबांनी सुद्धा अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी व

शिक्षणप्रसारासाठी भरीव कामगिरी केली आहे. तसेच भारतात बौद्ध धर्माचा नव्याने प्रसार व्हावा यासाठी ते अथक प्रयत्न करीत होते. डॉ.आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर भारतीय बौद्ध महासभा या संघटनेचे १९५८ साली ते एकमताने अध्यक्ष निवडले गेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेल्या बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसारासाठी भारतभर प्रवास केला. बौद्ध धर्माची आज भारताला गरज आहे. कारण तो समतेवरती आधारलेला आहे.दलित बांधवांनी स्वीकारावा यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले होते. तसेच आंतरराष्ट्रीय बौद्ध संमेलनाला हजर राहिलेले होते. भारत, सिलोन, थायलंड, बर्मा आणि इंग्लंड येथील बौध्द परिषदेस ते हजर राहून आपली मते मांडत होते.

१९६१ ते १९६६ पर्यंत महाराष्ट्र विधान परिषदेचे ते सदस्य होते. आमदार म्हणून त्यांनी दलित वर्गाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. तसेच १९७१ ते १९७५ या काळात मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचे ते सदस्य होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या स्थापनेपासून त्यांचा संबंध आला होता. प्रबुध्द भारत, जनता या साप्ताहिकाचे ते संपादक होते. तसेच आंतरराष्ट्रीय बौद्ध संमेलनास हजर राहिलेले होते. भारत, सिलोन,थायलंड,बर्मा आणि इंग्लंड येथील बौद्ध परिषदेत ते हजर राहून आपली मते मांडत होते.

१९६१ ते १९६६ पर्यंत महाराष्ट्र विधानपरिषदेचे ते सदस्य होते. आमदार म्हणून त्यांनी दलित वर्गाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. तसेच १९७१ ते १९७५ या काळात ते मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या स्थापनेपासून त्यांचा संबंध आला होता. प्रबुद्ध भारत, जनता या साप्ताहिकांचे ते संपादक होते. त्यातून त्यांनी मागासलेल्या व दलित वर्गावर होणाऱ्या अन्यायास वाचा फोडली आहे. त्यांचे लिखाण हे विचार प्रवर्तक व प्रेरणादायी आहेत. आजही नवीन पिढीला प्रोत्साहित करणारे आहेत. दूदैवाने भैय्यासाहेबांचे निधन वयाच्या ६३ व्या वर्षी १६ सप्टेंबर १९७७ साली झाले.[१०]

## ११. डॉ.पी.टी.बोराळे

डॉ.पी.टी.बोराळे हे सिद्धार्थ विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य होते. तसेच ते पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाचे ते सदस्यही होते. १२ डिसेंबर १९१४ रोजी त्यांचा जन्म झाला. विधी शाखेत त्यांना पी.एच.डी.मिळाली. पूर्वीचे अस्पृश्य हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. याशिवाय नागरिकांचे मूलभूत हक्क, बौद्ध धर्माची पुर्नस्थापना आणि बुद्धीझम इन इंडिया, बुद्धीस्ट पीस, फंडामेंटल राईटस् ऑफ सिटिझनस ही त्यांची पुस्तके फार गाजलेली आहेत. मुंबई विद्यापीठात अनेक पदावरती त्यांनी काम केले होते. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य, अॅकॅडमी कौन्सीलचे सदस्य, एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे पदाधिकारी होते. काही काळ ते विधी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि अखिल भारतीय म्युनिसिपल कारभार संघाचे ते अध्यक्ष होते. मुंबई विद्यापीठात डॉ.बोराळे हे विधी विषयात संशोधक आणि मार्गदर्शक म्हणून मान्यता होती. बोराळे हे मुंबईचे पहिले बौद्ध धर्मिय महापौर बनले (१९५९-६०) रिझर्व बँक ऑफ इंडियाचे ते सदस्य होते तर त्यांची काही काळ पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली होती.[११]

## १२. प्रा.अनंत काणेकर

प्रा. अनंत काणेकर हे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाचे उपाध्यक्ष होते आणि जस्टीस आर.आर.भोळे हे अध्यक्ष होते. १९४६ साली सिद्धार्थ कॉलेजचा जो पहिला प्राध्यापक वर्ग होता त्यामध्ये प्रा.अनंत काणेकर यांचा हे समावेश होता. ते मराठीचे अधिव्याख्याता म्हणून १९४६ साली रुजू झाले. १९५० साली ते मराठी विभागप्रमुख बनले. आणि त्या पदावरती राहून १९७० साली ते निवृत्त झाले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रा.अनंत काणेकर हे मराठीचे विख्यात साहित्यकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी जवळजवळ ३० पेक्षा अधिक मराठीमध्ये कादंबरी व इतर पुस्तके लिहीली. त्यांची काही पुस्तके मुंबई विद्यापीठाने अभ्यासक्रमात लावली. भारत सरकारने त्यांना पद्मश्री या सन्मानाने गौरविले आहे. प्रा.काणेकरांनी अनेक देशांना भेटी दिल्या आहेत. १९३७ आणि १९७२ ला त्यांनी रशियाला भेट दिली. १९६२ साली ते अमेरिकेला दुसऱ्यांदा गेले. युगोस्लाव्हाकीया या देशालाही प्रा.काणेकरांनी भेट दिली. औरंगाबाद येथे भरलेल्य मराठी साहित्य संमलेजनाचे ते अध्यक्ष होते.

असा हा श्रेष्ठ साहित्यिक सिद्धार्थ कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून बरीच वर्षे काम करीत होता. यावरुनच पीपल्स एज्युकेशनची योग्यता आपल्या लक्षात येते.[१२]

## १३. श्री.बी.एच.वराळे

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अत्यंत विश्वासू स्नेही म्हणून बी.एच.वराळे म्हणजे बळवंत हणमंतराव वराळे यांच्याकडे पाहिले जाते. १९२२ साली राजाराम कॉलेज मध्ये वराळे असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सान्निध्यात आले आणि हे सान्निध्य ४ डिसेंबर १९५६ म्हणजे डॉ.आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणा पर्यंत टिकून राहिले. म्हणजे जवळजवळ ३३ ते ३४ वर्षे त्यांनी डॉ.आंबेडकरांना जवळून अभ्यासले आहे.[१३]

बी.एच.वराळे हे मुळचे निपाणीचे राहणारे बेळगांव, धारवाड या कर्नाटक भागातील दलित चळवळीचे अध्वर्यू म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. ११ व १२ एप्रिल १९२५ रोजी मुंबई इलाखा प्रांतिक बहिष्कृत परिषदेचे तिसरे अधिवेशन निपाणी या ठिकाणी भरवून यशस्वी करण्यामागे बी.एच.वराळेंचा फार मोठा वाटा आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कामाशी ते सुरुवातीपासूनच संबंधित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर निपाणीमध्ये बऱ्याच वेळा त्यांच्याकडे येत असत.

बळवंत हणमंतराव वराळे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधावरील आठवणीवरती वराळेंचा मुलगा भालचंद्र यांनी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सांगाती' हे

पुस्तकही लिहीले आहे.

या पुस्तकामध्ये डॉ.आंबेडकरांचा संबंध कसा आला. तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे कार्य यासंबंधी बरीच माहिती दिली आहे. डॉ.आंबेडकरांच्या दलित मुक्ती चळवळीत व शिक्षणप्रसाराच्या चळवळीत त्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. एप्रिल १९५३ साली श्री.बळवंतराव वराळे यांची पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद येथे रजिस्ट्रार म्हणून डॉ.आंबेडकरांनी नेमणूक केली. मिलिंद महाविद्यालयाच्या नागसेन परिसराचा विकास करण्यासाठी श्री.वराळे यांनी अथक परिश्रम घेतले.

मिलिंद महाविद्यालयाचे वसतिगृह, अतिथिगृह व इतर वास्तू बांधण्यात वराळे यांनी मोलाचे योगदान दिले आहे. औरंगाबादला जो पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा व्याप दिसतो त्याचे श्रेय श्री.बी.एच. वराळे यांचेकडे जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुंबई व औरंगाबाद भागातच कार्यकर्ते तयार करत नव्हते तर निपाणी सारख्या भागात ही त्यांनी शैक्षणिक विचार पेरणारे नेतृत्व तयार केले.

काठमांडू या ठिकाणी भरलेल्या चौथ्या बौद्ध धम्म परिषदेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबर श्री.वराळे सुद्धा उपस्थित होते. डॉ.आंबेडकरांनी अनुसूचित जाती उन्नती विश्वस्त संस्था स्थापन केली होती. त्या संस्थेचे वराळे हे विश्वस्त व सदस्य होते. ते उत्तम प्रतीचे साहित्यिक असल्याने 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' या वर्तमान पत्रात वेळोवेळी लेख लिहित असत. १ जानेवारी १९५७ साली बी.एच.वराळे हे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य म्हणून निवडून आले. तर १९६४ ते १९६६ या कालावधीत ते उपाध्यक्ष झाले आणि १९७५ साली ते पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे ते तीन वर्षासाठी अध्यक्ष बनले. शेवटी ८ ऑगस्ट १९७७ रोजी बी.एच.वराळे यांचे दु:खद निधन झाले.

निधना पर्यंत म्हणजे १९७७ पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या उन्नती आणि विकासासाठी झटणारा एक प्रामाणिक व विश्वासू

सहकारी म्हणून श्री.बी.एच. वराळे यांना दलित समाजामध्ये मान आहे. डॉ. आंबेडकरांच्या सर्व चळवळीत त्यांच्या खांद्याला खांदा लावून भाग घेणारा एक कार्यकर्ता म्हणून वराळे प्रसिद्ध आहेत.[१४]

## १४.शांताराम शंकर रेगे

एस.एस.रेगे हे बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय जवळचे व प्रथमपासूनचे विश्वासू सहकारी होते. सिद्धार्थ कला व शास्त्र महाविद्यालयाचे ते पहिले ग्रंथपाल होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापकीय मंडळाचे ते सदस्य होते. १४ एप्रिल १९४६ रोजी सिद्धार्थ कॉलेजमध्ये ग्रंथपाल म्हणून त्यांना नेमले गेले. श्री. रेगे यांनी डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाने कॉलेजचे ग्रंथालय समृद्ध केले. दुर्मिळ पुस्तके आणण्यासाठी हैद्राबाद, बडोदा या ठिकाणी ते गेलेले होते. डॉ.आंबेडकरांना अतिशय उपयोगी पडणारे नेतृत्व होते. डॉ.आंबेडकरांच्या ग्रंथाच्या प्रकाशनावेळी रेगेची मदत होत असे. राजगृह या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथालयातील पुस्तके व्यवस्थित लावण्याची जबाबदारी रेगेंवरती होती. ती त्यांनी पूर्ण केली. डॉ.आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणा नंतर त्यांचा सर्व ग्रंथसंग्रह सिद्धार्थ कॉलेजच्या ग्रंथालयात व्यवस्थित ठेवला आहे. त्याचे श्रेय रेगे यांना जाते. श्री. एस.एस.रेगे हे ग्रंथपाल म्हणून जवळजवळ ३५ वर्षे सिद्धार्थ कॉलेजच्या सेवेत होते. त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची चांगल्याप्रकारे सेवा केली.

अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यात वरील व्यक्तिंचा महत्वाचा वाटा होता. या व्यक्तीशिवाय संपूर्ण महाराष्ट्रात आणि भारतात त्यांच्या शिक्षण धोरणाविषयी आपुलकी असणारे अनेक दलित व दलितेत्तर कार्यकर्ते होते.

डॉ.आंबेडकरांनी स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी म्हणजे डॉ. आंबेडकरांचे जीवंत स्मारकच होय. अशा आदराने त्यांचे जतन व वाढ करण्यासाठी या सन्माननीय व्यक्तींनी मोलाचे योगदान दिलेले आहे. डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यक्रमात सी.के.पी. म्हणजे चांद्रसेन कायस्थ प्रभू या जातीतील लोकांनी त्यांना फार मोठे सहकार्य

केले आहे. आज पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही एक महाराष्ट्रातील नामवंत व दर्जेदार शिक्षण देणारी संस्था बनली आहे. ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्यावरील लोकांनी केलेल्या सहकार्य व प्रयत्नामुळेच. [१५]

## २. वृत्तपत्रे

वर्तमान पत्रास लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ मानला जातो. कोणतीही सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि शैक्षणिक चळवळी यशस्वी करण्यासाठी वर्तमानपत्रांची भूमिका फार महत्वाची असते. लोकजागृतीचे एक महत्वाचे साधन म्हणून वृत्तपत्रांकडे पाहिले जाते. समाजामध्ये घडणाऱ्या दैनंदिन घटना वर्तमानपत्रांमधून सर्वांना समजतात. यातून समाजाला जागृत करण्याचे काम समाजाच्या मनावरती संस्कार करण्याचे कार्य, समाजातील लोकांच्या मध्ये नवीन विचारांची बीजे रुजविण्याचे कार्य वृत्तपत्रे खंबीरपणे करत असतात. त्यामुळे देशाच्या राष्ट्रीय जीवनास वृत्तपत्रांना महत्वाचे स्थान दिले जाते.

### वृत्तपत्रांची सुरुवात

भारतामध्ये वृत्तपत्रांची सुरुवात जेम्स ऑगष्टस हिकी याने २९जानेवारी १७८० साली " बंगाल गॅझेट " हे इंग्रजी साप्ताहिक सुरु करुन केली'[१६]. त्यानंतर १७८४ मध्ये 'कलकत्ता गॅझेट', १७८५ मध्ये 'मद्रास कुरीअर' ही वृत्तपत्रे सुरु झाली. भारतीय भाषातील वृत्तपत्रे १८१८ नंतर सुरु झाली. १८१६ मध्ये दिग्दर्शन बंगाली मासिक निघाले. मुंबई मध्ये पहिले वृत्तपत्र १७८९ मध्ये बॉम्बे हेरॉल्ड या नावाने सुरु झाले.

महाराष्ट्रामध्ये सुध्दा अनेक वृत्तपत्रे निघाली. या वृत्तपत्रांच्या पत्रकारांच्या मालिकेत बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन यांच्यापासून लो. टिळक, आगरकर, न.चिं. केळकर, खाडीलकर, आचार्य अत्रे, नानासाहेब परुळेकर अशा अनेक नामांकित व्यक्तींचा उल्लेख होतो. पारतंत्र्याच्या काळातील महाराष्ट्रातील आणि भारतातील लोकांना जागे करण्यासाठी त्यांच्यामध्ये स्वाभिमानाचे स्फुलिंग चेतविण्यासाठी वृत्तपत्रांनी मोलाची भर घातली.

समाज सुधारणे बरोबर समाज निर्मितीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या या वृत्तपत्रांना पत्रकारिकेच्या मालिकेत आणखीन एका पत्रकाराचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. ते नाव म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. बहुजन समाज जागृतीसाठी वृत्तपत्रांच्या इतिहासात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना डॉ.आंबेडकर असे संबोधले जात नाही.

## दर्पण (६ जानेवारी १८३२)

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सर्व सामान्य जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात राष्ट्रीयत्वाचा उदय झाला. राष्ट्रात घडत असलेल्या घटना जाणून घेण्यासाठी लोकांच्या मनामध्ये उत्सुकता निर्माण झाली.खास करून शिकलेल्या लोकांच्या मध्ये यांचे प्रमाण जास्त होते. आणि ही लोकांची उत्सुकता पूर्णत्वाकडे जाण्यासाठी वृत्तपत्रांची जबाबदारी महत्वाची ठरली.

' बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरु केले. सुरुवातीला हे पाक्षीक होते. [१७]

नव्या ज्ञानाचा प्रसार करणे आणि पाश्चात्य विद्येचा लोकांना परिचय करुन देणे हाच महत्वाचा भाग हे वृत्तपत्र सुरु करण्यामागे होता. आर्थिक आणि सामाजिक विषयाबरोबरच पुर्नविवाह, धंदे शिक्षणाची गरज यावरती जांभेकरांनी लेख लिहिले.

## प्रभाकर ( २४ ऑक्टोबर १८४१)

२४ ऑक्टोबर १८४१ रोजी भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' हे वृत्तपत्र सुरु केले. अंधश्रध्देने पछाडलेल्या भारतीय समाजाला पाश्चात्य शिक्षणाचे, नवविचारांचे ज्ञान देवून त्यांच्या अंधश्रध्दा दूर कराव्यात या हेतूनी हे वृत्तपत्र निघाले. याच काळात अस्पृश्यांच्या मुलांना ऐतद्देशिय लोक शाळेत बसू देण्यास विरोध करीत होते. या संबंधीच्या किंवा त्यांना शिक्षण मिळणे सक्तीचे झाले पाहिजे या संबंधीचा विचार या काळातील वृत्तपत्रांनी मांडलेला दिसत नाही.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## ज्ञानप्रकाश ( १२ फेब्रुवारी १८४९)

कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी १२ फेब्रुवारी १८४९ मध्ये हे वृत्तपत्र सुरु केले. १९०९ ते १९५० पर्यंत म्हणजे हे वृत्तपत्र बंद पडेपर्यंत ना.गोपाळकृष्ण गोखले यांच्या मालकीचे होते. सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्राला आकार देण्याचे महत्वाचे कार्य या वृत्तपत्राने केले.[१८]

ब्रिटीश राजवटीमध्ये ऐतद्देशियांची अनेक वृत्तपत्रे निघाली. यामध्ये दिनबंधू, इंदूप्रकाश, केसरी, सुधारक, जागरुक, भाला इ. यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.

मराठी व इतर भाषामध्ये अनेक वृत्तपत्रे निघाली. या सर्वच वृत्तपत्रांचे मालक, चालक अथवा लिहिणारे हे उच्च विद्याविभूषीत व प्रामुख्याने ब्राम्हण वर्गातीलच होते. या वृत्तपत्रांमधून या अभिजन वर्गाची सर्वच क्षेत्रातील मक्तेदारी कायम राहण्यासाठी सगळे प्रयत्न केले जात होते.

## दीनबंधू ( १जानेवारी १८७७ )

म.जोतीराव फुले यांच्या विचार व चळवळीतून ब्राह्मणेत्तर पत्रांचा जन्म झाला. म्हणूनच १ जानेवारी १८७७ साली कृष्णराव भालेकर यांनी दीनबंधू हे पत्र सुरु केले. आर्थिक ओढाताणीमुळे भालेकरांनी हे पत्र १८८० साली नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कडे दिले. [१९]

आपल्या दीनबंधू या वृत्तपत्रांमध्ये शिक्षणाबद्दलची परखड मते म. फुले मांडत असत. शिक्षण क्षेत्रामध्ये शुद्रातिशुद्रातील शिक्षक नेमल्याशिवाय त्यांना शिक्षणाचे महत्व कळू शकणार नाही. ही भूमिका फुले मांडत होते. ब्राह्मणेत्तरांची स्वतंत्र वृत्तपत्रेच त्यांच्या भावभावना विचार मुक्तपणे प्रकाशित करु शकतील असा विश्वास म.फुलेंना वाटत होता. पुन्हा एकदा या वृत्तपत्राची परवड झाली. १९०५ साली दामोदर सावळाराम यंदे व वासुदेव लिंगोजीराव बर्जे यांनी या पत्राला आधार दिला.

दीनबंधू सारखे एखादे बहुजन समाजाचे वृत्तपत्र वगळता समाज जागृतीचे महत्वाचे

कार्य करणाऱ्या बहुसंख्य वृत्तपत्रांतून तळागाळातील सामान्य माणसांची दु:खे वेशीवरती मांडली जात नसत. त्यांच्या समस्या, अज्ञान, दारिद्र्य याला कोण जबाबदार आहे ? याची जाणीव या वृत्तपत्रांमधून व्हायला हवी होती. पण ते काम तेवढ्या मोठ्या प्रमाणात झाले नाही. वैज्ञानिक वृत्तीपेक्षा धर्मश्रध्दाळू वृत्ती प्रकर्षाने या वृत्तपत्रांच्या लेखणातून दिसून येते. दीनबंधू या वृत्तपत्राने ब्राह्मणेत्तरांचा फक्त कैवारच घेतला असे नाही तर ब्राह्मणेत्तरांच्यामध्ये सत्व आणि सत्वाची जाणीव निर्माण करण्याचे फार मोठे कार्य केले. आपल्या हक्क आणि अधिकाराचा बाबतीत दीनबंधू म्हणतो,

" राजकर्त्यांनी आपण होऊन दिलेले अधिकार आपणास नकोत. राज्यकर्त्यापासून ते जबरदस्तीने घेतले पाहिजेत." [२०]

अंधश्रध्दा अज्ञान हे मागासलेल्या समाजात प्रकर्षाने होते. ते दूर करण्याचे प्रामाणिक प्रयत्न १९२० पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयापर्यंत मोठ्या प्रमाणात झाले नव्हते. म. फुलेंच्या दीनबंधू सारखे किरकोळ वृत्तपत्रे वगळता बहुजन समाजाच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम कोणत्याही वृत्तपत्राने केले नव्हते.

ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रे ही एका अपरिहार्य गरजेतून जन्माला आलेली होती. शेतकरी, कष्टकरी यांच्या जीवनमरणांच्या प्रश्नांचा उहापोह त्यातून होत असे. दीनबंधू , दीनमित्र, शेतकऱ्यांचा कैवारी, अंबालहरी, विजयी मराठा या सारख्या ब्राह्मणेत्तर पत्रांनी आपली लेखणी परजली. या वृत्तपत्रांना विरोधही तितकाचा सहन करावा लागला. दीनबंधू हा ब्राह्मण निंदेसाठी जन्माला आला आहे. म्हणून त्याच्या नामोहरणासाठी ' वार्ताहर, विक्षिप्त' सारख्या ब्राह्मणी वृत्तपत्रांनी काम केले. सत्यशोधक चळवळ ही धर्मद्रोही आहे अशी टीका विष्णूशास्त्री चिपळूणकर आपल्या निबंधमालेत करीत असत." [२१]

## डॉ.आंबेडकर पूर्व दलित वृत्तपत्रीय लेखन-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या अभिजन वर्गांच्या वृत्तपत्रीय लेखनाची जाणीव असल्याने स्वत:च्या वृत्तपत्राची निकड त्यांना जाणवत होती. या संबंधात ते म्हणतात,

"कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्रांची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षांप्रमाणे होते." [२२]

ब्रिटीश राजवटीमध्ये ऐतद्देशियांची अनेक वृत्तपत्रे निघाली. यामध्ये दिनबंधू इंदू प्रकाश, केसरी, सुधारक, इ. जागरुक, भाला इ. यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.

मराठी व इतर भाषामध्ये अनेक वृत्तपत्रे निघाली या सर्वच वृत्तपत्रांचे मालक, चालक अथवा लिहणारे हे उच्च विद्याविभूषीत व प्रामुख्याने ब्राम्हण वर्गातीलच होते. या वृत्तपत्रामधून या अभिजन वर्गाची सर्वच क्षेत्रातील मक्तेदारी कायम राहण्यासाठीचे सगळे प्रयत्न केले जात होते.

ब्राह्मणेत्तरातील बहिष्कृत वर्गाला वृत्तपत्रांच्या चळवळीत नगण्य स्थान होते. बहुतेक ब्राह्मणी पत्रांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांची उपेक्षा केली. त्यांच्या मुक्तीलढ्याच्या विचारच केला गेला नाही. अस्पृश्यांच्या प्रश्नांना प्रथम प्राधान्य द्यावे हा विचारच त्यांना रुचणारा नव्हता. आणि मग आपल्या सुख दुःखाचा भवितव्याचा संघर्षाचा विचार स्वतः च केला पाहिजे ही अत्यंत महत्वाची निकड आहे. हे पहिल्या दलित पत्रकाराला वाटले. तो म्हणजे गोपाळबुवा वलंगकर.

म. फुलेच्या दीनबंधू, सुधारक मधून गोपाळबुवा वलंगकरांच्या लेखणीला प्रसिध्दी मिळत होती. १८८८ साली विटाळ विध्वंसन नावाची पुस्तिका लिहिली. यातून ब्राह्मणी धर्ममार्तंडाचे ढोंग उघड्यावर आणले. या बरोबरच अस्पृश्यातील सर्व जातीना एकत्र करुन धर्मशास्त्रांचा रुढींचा परंपरांचा निषेध करण्यात प्रवृत्त केले. म. फुलेच्या प्रेरणेने त्यानी अखंड रचना केली आणि दीनबंधूतून ती प्रकाशीत केली. [२३]

शिवराम जानबा कांबळे या अस्पृश्याने म. फुलेंच्या प्रेरणेने १ जुलै १९०८ 'सोमवंशीय मित्र' या पत्राची सुरुवात केली. [२४] या वृत्तपत्रातून बहिष्कृत लोकांच्या शिक्षणाची मागणी केली. शिक्षण सरकारने दिले पाहिजे असा आग्रह या पत्रातून शिवराम

जानबा कांबळे यांनी केला. यांच्या पूर्वीच किसन फागू बंदसोडे यांनी १९०१ साली मराठा दीनबंधू, १९०६ साली अत्यंज विलाप आणि १९०७ साली महारांचा सुधारक अशी पत्रे काढली. [२५]

उन्नतीसाठी ज्ञानाची गरज असते आणि ज्ञान हे विद्यापासून येते. विद्याही शिक्षणापासून येते आणि शिक्षणाशिवाय विद्यामुळीच येणार नाही. मग मात्र विद्या नाही तर ज्ञान कसे यावे ? असा प्रश्न शिवराम जानबा कांबळे यांनी आपल्या ' सोमवंशीय मित्र ' या १ मार्च १९०९ च्या पत्रात केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व वृत्तपत्रीय लेखनातून अस्पृश्य किंवा बहिष्कृत लोकांच्या स्वाभिमानासाठी त्यांच्यामध्ये नविचेतना, प्रेरणा निर्माण करण्यासाठी संघटन, शिक्षण या गोष्टीवरती भर दिला गेला. यातूनच पुढे १९२० मध्ये डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली. आणि त्यांनी ओळखले होते कोणत्याही चळवळी पुढे नेण्यासाठी वृत्तपत्रे महत्वाची कामगिरी करतात. म्हणून त्यांनी स्वत:ची वृत्तपत्रे काढावयास सुरुवात केली.

## डॉ.आंबेडकरांच्या वृत्तपत्रांचे शैक्षणिक कार्य

भावी उन्नती व तीचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रांसारखी अन्य भूमीच नाही असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. दलितांना आपल्या मध्ये उन्नती करावयाची असेल तर त्यांच्यासाठी राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक चळवळींची गरज होती. आणि या चळवळी लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी वृत्तपत्रासारखे साधन नाही. यावरही डॉ.आंबेडकरांचा विश्वास होता. म्हणून त्यांनी स्वत:ची वृत्तपत्रे काढावयास सुरुवात केली. कारण तत्कालीन केसरी, भाला, वृत्तपत्रांनी बहिष्कृतांच्या समस्यांची, त्यांच्या सुधारणाबाबत प्रश्नांची उपेक्षाच केलेली होती. याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती म्हणून स्वत:ची वृत्तपत्रेच सर्व समस्यांचे निराकरण करु शकतील म्हणून वृत्तपत्रे या क्षेत्राकडे डॉ.आंबेडकरानी गांभीर्याने लक्ष दिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक ( १९२० ), बहिष्कृत भारत ( १९२७ ), जनता ( १९३० ) आणि प्रबुध्द भारत ( १९५६ ) या चार वृत्तपत्रांची सुरुवात केली. या वृत्तपत्रातून सामाजिक , धार्मिक, सांस्कृतिक समस्याबरोबर शैक्षणिक प्रश्नांची चर्चा केली गेली. शिक्षणाबाबतची मते त्यामधून सामान्य जनतेला सांगण्याचा प्रयत्न केला. यातूनच अस्पृश्यामध्ये पुढे मोठी शैक्षणिक क्रांती झाली. त्याचे श्रेय १९२० पासून १९५६ पर्यंत वेगवेगळया काळात सुरु केलेल्या वृत्तपत्रांना द्यावे लागते.

## 1) मूकनायक

दत्तोबा पवार या गृहस्थांमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राजर्षी शाहू महाराज यांच्याशी प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग आला. शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना आर्थिक सहाय्य देवून एक पाक्षिक काढावयास लावले.आणि ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले. आणि मूकसमाजाचे नेतृत्व या पुढे डॉ. आंबेडकरांनी केले. पांडूरंग नंदराम भटकर हे या पाक्षीकाचे संपादक म्हणून डॉ. आंबेडकरांनी नेमले. भटकर यांचे मॅट्रीक पर्यंत शिक्षण झाले होते. [२६] अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी बहिष्कृत्यांना जागे करण्यासाठीचा तो एक प्रयत्न होता. यावेळी 'केसरी' सारख्या वृत्तपत्राने मूकनायका बद्दल दोन शब्द लिहिणे तर सोडाच पण पैसे घेऊन जाहिरात सुध्दा छापण्याचे नाकारले. [२७]

मूकनायक पाक्षिकाच्या पहिल्या अंकात डॉ.आंबेडकरांनी पाक्षिकाच्या उद्देशाचे समर्थन अगदी सहज व सोप्या भाषेत मांडले पहिल्या अंकात ते म्हणतात,

' हिंदूस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेर घर आहे. हिंदू समाज हा एक मनोरा आहे.पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्यास शिडी नाही एका मजल्यावरुन दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्यांनी त्याच मजल्यात मरावे, खालच्या मजल्यातील इसम मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील माणूस मग तो कितीही

नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कुणाचीही छाती नाही." [२८]

मूकनायक ही झंझावाताची सुरुवात होती. पण ५ जुलै १९२० रोजी डॉ. आंबेडकर उर्वरीत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लंडनला गेले. ते ३ एप्रिल १९२३ रोजी भारतात परत आले. यामुळे या मूकनायकात एकूण डॉ.आंबेडकरांनी १४ लेख लिहिले. विलायतीतील शिक्षण घेत असलेल्या काळात भारतात मूकनायकाच्या संगोपनात व्यवस्थापकीय मंडळींनी फारसा रस घेतला नाही. पुढे ज्ञानदेव घोलप हे संपादक बनले. मूकनायकाने दलितांच्या आकांक्षा रुजविण्याचा पहिला प्रयत्न केला.

## शिक्षण विषयक मते

शिक्षणाच्या विविध स्तरांचा विचार करताना प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टीने अत्यंत महत्वाचा मूलभूत व मौलिक आहे अशी डॉ. आंबेडकरांची विचारसरणी होती. गोपाळ कृष्ण गोखलेनी १९१० साली वरिष्ठ कायदेमंडळात प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असे मत मांडले होते. याचा पुनर्रुच्चार आपल्या मूकनायकामधून डॉ. आंबेडकरांनी केलेला दिसतो.

प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचाच पुरस्कार करुन डॉ. आंबेडकर थांबत नाहीत. ते म्हणतात. ज्यांनी आधीच शिक्षणाचा लाभ घेतला आहे. त्यांना सक्ती करण्याचे गरज नाही. प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीबरोबर ते मोफत ही असावे असा आग्रह डॉ. आंबेडकरांनी धरला व तो सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी मूकनायका मधून प्रसिध्द केला.

वृत्तपत्रे ही प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे साधन होते. यामुळे डॉ. आंबेडकरानी दलितांची दु:खे मांडण्यासाठी वृत्तपत्रे सुरु केली.मूकनायक वृत्तपत्राला जरी आयुष्य अल्प लाभले असले तरी शिक्षण क्षेत्रातील प्रश्नाबाबत रान उठविण्याचे मौलिक काम त्याने केले.अस्पृश्यांच्या अस्मिता जागविण्याचे काम मूकनायकाने केले अल्पावधीत केलेले हे कार्य लोकजीवन घडविणारे होते. प्रबोधनाचा तो प्रभावी अविष्कार होता. पण शेवटी १९२३ साली मूकनायक बंद पडले.

## बहिष्कृत भारत ( ३ एप्रिल १९२७)

बहिष्कृतांची चळवळ भक्कम पायावरती उभी करण्यासाठी, विविध टिकाकारांनी केलेल्या टिकांना उत्तर देण्यासाठी, डॉ.आंबेडकराना वृत्तपत्राची निकड जाणवू लागली. म्हणून त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक सुरु केले. [२९]

बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे लेखन मूकनायकातील लेखापेक्षा धारदार होते. डॉ. आंबेडकरांना शिक्षण हे सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे महत्वाचे साधन वाटते. बहिष्कृत भारताच्या १५ जुलै १९२७ च्या 'आप घरी बाटा, बाप घरी ही बाटा या डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या अग्रलेखात ते म्हणतात,

"उपासमारीने शरिराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो." [३०]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृतांच्या मागासलेपणाचा अभ्यास केला होता. त्या मागासलेपणाच्या निर्मुलनासाठी शिक्षण हेच उत्तम औषध आहे असे त्यांना वाटत होते. यातून मोठ्या प्रमाणात अस्पृश्य लोकांच्यामध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण झाली. अस्पृश्यांनी शिकलेच पाहिजे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा विचार प्रथमतः म.फुलेंच्या नंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रामधून मांडला गेल्याने अस्पृश्य समाजामध्ये शिक्षण घेण्याचे काम मंदगतीने का असेना पण सुरु व्हावयास दिशा मिळाली.

अस्पृश्यांना स्वतंत्र व्यक्तीमत्व या बद्दल कसलीही जाणीव नव्हती आणि व्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीच्या अंगी यावयाचे असेल तर ते शिक्षणाशिवाय येऊच शकत नाही. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या विचारांचा प्रसार स्वतः:ची वृत्तपत्रे होती म्हणून झाला आणि म्हणून अस्पृश्य समाजात शैक्षणिक प्रगती होऊ शकली.

डॉ. आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाची सक्ती व ते मोफत हवे या बद्दल आग्रह

धरला कारण, जो पर्यत दलित समाजाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळणार नाही. तोपर्यंत त्या समाजाची प्रगती होणार नाही किंबहुना राष्ट्राची प्रगती होणार नाही असे त्यांना वाटे या संबंधात मुंबई इलाख्यातील शिक्षणाची प्रगती बाबत बहिष्कृत भारताच्या अंकात ते म्हणतात,

" प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रांच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे.केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यास कैक शतके लागतील म्हणूनच शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस असलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करुन लोकांची निरक्षरता पार केली. असे आपणास दिसून येते, जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ होतात त्यांच्यावर शिक्षणाची अर्थातच सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही. व जे त्या बाबतीत उदासिन असतात, त्यांच्या करीताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते. " [३१]

बहिष्कृत भारताच्या ३ जून १९२७ च्या अंकात 'न्याय तरी द्या' या सदरात डॉ. आंबेडकरांनी शाळा, शिक्षक आणि शिक्षण या तिन्ही बाबींची जबाबदारी किती महत्वाची आहे. या बाबत ते लिहीतात,

"शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्या तर ती गोष्ट निराळी पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करुन त्यांना समाजहितास योग्य असे वळण लावायचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याची कारखाने आहेत अर्थात या कारखान्यात फोरमन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. शाळा म्हणजे काही हिंदू उपहारगृह नव्हे की त्यात ब्राह्मण भटचारी ठेवला की भागले. ब्राह्मणाच्या हातचे अन्न जरी सर्वांना चालत असले तरी ब्राह्मणांच्या हातचे शिक्षण या काळात कोणासच चालणे शक्य नाही." [३२]

यावरुन एका विशिष्ट वर्गाने राबविलेले शिक्षण आणि शैक्षणिक रचना बदलली

पाहिजे हा क्रांतीकारक विचार डॉ. आंबेडकरांनी मांडलेला आहे. म. फुले ज्या प्रमाणे ज्या त्या जातीतील मुलांना शिक्षण देण्यासाठी त्या त्या जातीतीलच शिक्षक हवे असे हंटर कमिशन ला सांगितले तोच धागा पूढे १९२७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी पकडलेला दिसतो.

शिक्षक कसा असावा या बाबत ही डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे मते मांडलेली आहे. शिक्षक हा निःपक्षपाती उदात्त आणि थोर मनाचा तसेच समाजहितास आणि मुख्य म्हणजे तो सारथी असावा असे डॉ. आंबेडकरांना वाटे.प्राध्यपकांची गुणवत्ता, सहशिक्षणाचा पुरस्कार आणि अस्पृश्यांच्या शिक्षणाचा स्वतंत्र विचार सरकारने करावयास हवा. या संबंधीचे मौलिक विचार बहिष्कृत भारतातून प्रसिध्द केले.

दलित समाजाला शिक्षणाचे महत्व सांगत असतानाचा सरकारलाही कर्तव्याची, जबाबदारीची जाणीव डॉ.आंबेडकरांनी करुन दिलेली आहे. अशा प्रकारे बहिष्कृत भारताने एक झंझावात निर्माण केला.

बहिष्कृत भारत वेळेवर निघत नाही तो वर्गणीदारांच्या हाती वेळेवर पडत नाही. या आलेल्या बरोबरच आर्थिक दुरावस्था आणि एकट्यानेच स्वीकारलेली जबाबदारी यामुळे अनियमितता आली. बहिष्कृत भारताचे २४ रकाने एकटे बाबासाहेब लिहीत होते. शेवटी १५/११/१९२९ रोजी बहिष्कृत भारताचा शेवटचा अंक प्रकाशित होऊन मूकनायकाप्रमाणे बहिष्कृत भारत बंद पडले.

## जनता ( २४ नोव्हेंबर १९३० )

२४ नोव्हेंबर १९३० रोजी जनताचा पहिला अंक प्रकाशित झाला. जनता हे प्रारंभी पाक्षीक होते. पण ३१ ऑक्टो. १९३१ रोजी ते साप्ताहिक झाले. जनता पत्राचे आयुष्य २५ वर्षाचे होते. जनतेत खास करुन विलायतेत डॉ. आंबेडकर असताना तेथून केलेला पत्र व्यवहार त्यामध्ये छापला आहे. या पत्रामधून सुध्दा आपल्या सहकाऱ्यांना शिक्षणाबाबत कराव्या लागणाऱ्या सूचना व दिशा दिल्याचे दिसते. या वृत्तपत्राचेच पुढे नामंतर प्रबुध्द भारतात झाले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## प्रबुध्द भारत

या वृत्तपत्राची जबाबदारी डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव यशवंतराव आंबेडकरांच्या वरती पडली. कारण ६ डिसेंबर १९५६ साली डॉ. आंबेडकराचे महानिर्वाण झाले. प्रबुद्ध भारतानेही राजकीय ,सामाजिक धार्मिक विषयाबरोबरच शैक्षणिक विचारांचा प्रसार करण्याचे महत्वाचे कार्य केले.१९६१ साली हे साप्ताहिक बंद पडले.

थोडक्यात मागासवर्गीयांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी डॉ.आंबेडकरांनी विविध मार्गाचा अवलंब करताना वृत्तपत्रे यांना प्राधान्याने महत्व दिले.डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यामध्ये त्यांचे सहकारी जितके महत्वाचे होते. तितकेच त्यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रांचे योगदानही महत्वाचे आहे. आज मागासवर्गीय समाजामध्ये जी शैक्षणिक प्रगती दिसते आहे. त्याचे श्रेय डॉ.आंबेडकरांच्या बरोबरच त्यांचे सहकारी व वृत्तपत्रानांही द्यावे लागते. डॉ.आंबेडकरांनी १९२० साली सामाजिक कार्याला सुरुवात केली आणि १९४५ साली पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करुन अनेक महाविद्यालये स्थापन केली. अवघ्या २५ वर्षात शैक्षणिक कार्याचा डोंगर उभा केला.

हा आदर्श घेऊन आज महाराष्ट्रभर डॉ.आंबेडकरांच्या अनुयायांनी शेकडो शाळा, महाविद्यालये सुरु करुन मागासवर्गीयांच्या शैक्षणिक कार्यास हातभार लावत आहेत. डॉ.आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर सुद्धा त्यांनी तयार केलेल्या कार्यकर्त्यांनी शैक्षणिक चळवळ गतीने पुढे नेण्याचे काम केले व करीत आहेत.

## संदर्भ व तळटीपा

१) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील श्री.डी.जी.जाधव यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

२) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील श्री.रावबहाद्दूर भोळे यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

३) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील श्री.न्यायमूर्ती आर.आर.भोळे यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

४) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील बॅ.एम.बी.समर्थ यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

५) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील प्रा.व्ही.जी.राव यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

६) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील आर.डी.कोवळी यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

७) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील प्राचार्य एम.बी.चिटणीस यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

८) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील कृष्णाजी भिकाजी उर्फ घन:शाम तळवटकर यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

९) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील एस.जी.टीपणीस यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

१०) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

११) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील डॉ.पी.टी.बोराळे यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

१२) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील प्रा.अनंत काणेकर यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

१३) भगवानराव हणमंतराव वराळे डॉ.आंबेडकरांच्या सांगाती
श्री विद्या प्रकाशन, पुणे - १९८८-पृष्ठ१

१४) पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ऑफीसमधील बी.एच.वराळे
यांची वैयक्तिक फाईल, मुंबई.

१५) शा.श.रेगे यांची वैयक्तिक फाईल.

१६) लेले रा.के. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९८४.पृ.२३

१७) भोसले एस.एस. (संपादक) पुढारीकार ग.गो.जाधव गौरव ग्रंथ,
अमृतमहोत्सवी प्रकाशन, कोल्हापूर, १९८२, पृष्ठ ७७.

१८) शिंदे मा.श्री. विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे १९७३, पृष्ठ १५.

१९) भोसले एस.एस. (संपादक) उपरोक्त, पृष्ठ १८८.

२०) दीनबंधू, २७ एप्रिल १९०७, अंक ३०.

२१) पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,
अभिजित प्रकाशन नागपूर, १९८७, पृष्ठ १३.

२२) दै.सम्राट, २० एप्रिल २००५, पृष्ठ ४.

२३) कित्ता, पृष्ठ १४ ते १९.

२४) कित्ता, पृष्ठ २०.

२५) कित्ता.

२६) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९पृष्ठ ४५.

२७) बहिष्कृत भारत, २० मे १९२७.

२८) कित्ता.

२९) कीर धनंजय, उपरोक्त.

३०) बहिष्कृत भारत, १५ जुलै १९२७.

३१) बहिष्कृत भारत, ३१ मे १९२९.

३२) बहिष्कृत भारत, ३ जून १९२७.